कृषीवल

रायगड, रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹

## वाढीव वेतनाचा हप्ता गायब!

**मुंबई** : एसटी कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळाले असले, तरी वाढीव वेतनाचा फरक हप्ता न मिळाल्याने राज्यभर संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानंतरही हप्ता न दिल्याचा आरोप करत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने तीन दिवसांत रक्कम न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला आहे. एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी दरमहा सुमारे ४७५ कोटी रुपयांची आवश्यकता असते. त्यासोबतच वाढीव वेतनाच्या फरकासाठी ५८ कोटी ३० लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम लागते. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी उपमुख्यमंत्री पान २ वर

## सरकारचा लाडक्या बहिणींना दिलासा

**मुंबई** : मुंबई : महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अपात्र लाभार्थ्यांची अंगणवाडी सेविकांकडून प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा पूर्वीचा निर्णय रद्द केला आहे. त्याऐवजी ई-केवायसीची माहिती ऑनलाइन पोर्टलवर पूर्ण करणे किंवा दुरुस्त करण्याची अंतिम मुदत आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. महिला व बालकल्याण विभागाने हा निर्णय घेतला असून, ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान लाभार्थ्यांना अडचणी येत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर हा बदल करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात 75 टक्के मतदान

## दुपारी साडेतीन वाजेपर्यंत नऊ लाखांहून अधिक मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

### प्रशासनाचा ढिम्म कारभार; माहिती मिळण्यास अडचण

### उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत; सोमवारी निकाल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेत ५९ तर पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी शनिवारी (दि.७) जिल्ह्यातील २,३२३ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली. जिल्ह्यात दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ५७.७७ टक्के मतदानाची नोंद झाली होती. प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे सायंकाळी ५.३० नंतरची अधिकृत आकडेवारी रात्री उशिरापर्यंत उपलब्ध होऊ शकली नाही. मात्र, दुपारनंतर मतदान केंद्रांवरील वाढता उत्साह लक्षात घेता अंतिम मतदानाची टक्केवारी सुमारे ७५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. मतदान सुरू झाल्यानंतर सात ठिकाणी मतदान यंत्रांमध्ये बिघाड झाल्याची समस्या निर्माण झाली होती. तथापि, प्रशासनाने तात्काळ पर्यायी व्यवस्था केल्याने हा प्रश्न अल्पावधीत मार्गी लावण्यात आला. कामार्ले परिसरातील किरकोळ वादाची घटना वगळता संपूर्ण जिल्ह्यात मतदान शांततेत पार पडले.



● भाई जयंत पाटील, सुप्रिया पाटील यांनी बजावला मतदानाचा हक्क

जिल्हा परिषदेच्या ५९ आणि पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी एकूण ५०२ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. शनिवारी सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. प्रारंभी काही केंद्रांवर अल्प प्रतिसाद दिसून आला, तर काही ठिकाणी सकाळपासूनच मतदारांची मोठी गर्दी झाली. अनेक मतदान केंद्रांवर रांगा लागल्या होत्या. अलिबाग तालुक्यातील सहाण, महाडमधील सांदोशी तसेच पोलादपूरमधील दोन केंद्रांसह एकूण सात मतदान केंद्रांवर मशीन बिघाड झाला. काही ठिकाणी १५ मिनिटे, काही ठिकाणी पाऊण तास, तर काही ठिकाणी तब्बल एक पान २ वर

### कडेकोट बंदोबस्त


मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस, एसआरपी, होमगार्ड यांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मतदान केंद्रापासून ५० ते १०० मीटर परिसरात अनावश्यक वावरास बंदी होती. वाहन पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. दिव्यांग, रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत वाहनाने जाण्याची परवानगी देण्यात आली होती. काही संवेदनशील केंद्रांवर सीआरपीएफ जवान तैनात करण्यात आले होते. मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास बंदी होती.



● मतदानाच्या पार्श्वभूमीवर चित्रलेखा पाटील यांनी ज्येष्ठांशी साधला संवाद.

### मशीनमध्ये बिघाड

सहाण येथील मतदान केंद्रात मशीन बिघाड झाल्याने मतदारांना काही काळ प्रतीक्षा करावी लागली. पर्यायी मशीन उपलब्ध झाल्यानंतर पाऊण तासाने मतदान पुन्हा सुरू झाले. अलिबागसह सहा तालुक्यांमध्ये कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिटमध्ये बिघाड आढळला. सुधागड तालुक्यात दोन ठिकाणी अशी समस्या निर्माण झाली होती. एकूण सात मशीन बदलण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली.




### व्हीव्ही पॅट मशीनच्या अभावावर शंका

विधानसभा निवडणुकीदरम्यान व्हीव्ही पॅट मशीनचा वापर करण्यात आला होता. मात्र, या निवडणुकीत व्हीव्ही पॅटचा वापर करण्यात आला नसल्याने अनेक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला. मतदान नेमके कोणाला झाले, याची खात्री मतदारांना करता आली नाही, यामुळे काहींनी शंका उपस्थित केल्या.

### मंडपाअभावी मतदार, कर्मचारी उन्हात

मतदारांची गैरसोय टाळण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. मात्र, अलिबाग तालुक्यातील काही मतदान केंद्रांवर मंडपाचा अभाव असल्याने मतदारांना उन्हात उभे राहावे लागले. पोलीस व कर्मचारी यांनाही सावलीसाठी अन्य घरांचा आधार घ्यावा लागला.

## राज्यात भरघोस मतदान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवारी मतदान यंत्र बंद पडणे, वादावादीच्या किरकोळ घटनांचा अपवाद वगळता शांततेत ७० ते ७५ टक्के इतके भरघोस मतदान झाले. सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये लहान मुलांना मतदान यंत्रापर्यंत जाऊ देण्यात आल्याच्या घटनेची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेत सबंधितांवर कठोर कारवाईचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या निवडणुकीची सोमवारी मतमोजणी होणार आहे.

राज्यातील ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत असलेल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यामध्ये शनिवारी मतदान पार पडले. महापालिकांच्या तुलनेत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी शनिवारी मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. सकाळपासूनच अनेक ठिकाणी मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. रत्नागिरी जिह्यातील चिपळूण तालुक्यात काही ठिकाणी मतदान यंत्र(ईव्हीएम) बंद पडण्याच्या घटना घडल्या. आणखी काही जिह्यात मतदान यंत्रात बिघाड झाल्याच्या तक्रारी करण्यात आल्या. मात्र, मतदान यंत्र दुरुस्त करून लगेच मतदान सुरु करण्यात आले.

जिल्हा परिषद पान २ वर



# निवडणुकीत ‘चाकरमान्यां’वर कोट्यवधींचा खर्च

## पोलादपूर तालुक्यात उमेदवारांची खर्चिक धावपळ; मतदार ओळखपत्र आधारशी लिंक नसल्याचा फटका

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील केवळ २५ ते ३० टक्के मतदार ग्रामीण भागात वास्तव्यास असून, सुमारे ७० टक्के मतदार हे बाहेरगावी राहणारे ‘चाकरमानी’ असल्याचे चित्र आहे. या मतदारांना दुबार मतदार म्हणून गावाकडे आणण्यासाठी उमेदवारांना ने-आण, जेवण-खाणं आणि विविध सोयीसुविधांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करावा लागत असल्याची चर्चा आहे. एवढा खर्च करूनही मतांची खात्री नसल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवारांवर आर्थिक ताण वाढल्याचे दिसते.



यंदा रायगड जिल्हा परिषदेच्या दोन गटांतील सहा उमेदवारांपैकी तुल्यबळ लढतीतील चार उमेदवार तसेच पोलादपूर पंचायत समितीच्या चार गणांतील आठ उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर खर्चाची तरतूद करावी लागल्याचे चित्र आहे. सकाळी साडेसात ते दुपारी साडेतीन या कालावधीत अधिकृत आकडेवारीनुसार, ५५.७३ टक्के मतदान झाले. शेवटच्या दोन तासांत मतदानात फारशी वाढ झाल्याचे दिसून आले नाही. कापडे बुद्रुक गटातील उमेदवार अजय सलागरे यांनी कापडे बुद्रुक शाळेत सपत्नीक मतदान केले. निलेश कुंभार यांनी वाकण शाळेत मतदान केले. लोहारे गटातील उमेदवार चंद्रकांत कळंबे यांनी उमरठ येथे, तर कृष्णा कदम यांनी ओंबळी प्राथमिक शाळेत मतदानाचा हक्क बजावला.

कापडे बुद्रुक जि.प. गटात माटवण पं.स. गणांतर्गत गोवेले, उमरठ, धारवली, कालवली, मोरसडे, बोरघर, आडावळे बुद्रुक, बोरावळे, माटवण, देवळे, वाकण, कापडे बुद्रुक, कापडे खुर्द, चांभारगणी बुद्रुक आणि बोरज येथील मतदार साक्षी कांबळेकर विरुद्ध हर्षदा वरवाटकर तसेच अजय सलागरे विरुद्ध निलेश कुंभार यांचे भवितव्य ठरविणार आहेत.

कापडे बुद्रुक पंचायत समिती गणात देवळे, करंजे, दाभिळ, लहुळसे, केवनाळे, वाकण-१, वाकण-२, नानेघोळ, कापडे खुर्द, कापडे बुद्रुक १, २, ३, रानकडसरी, रानबाजिरे, चांभारगणी बुद्रुक, निवे, किनेश्वर, साखर येथील मतदारांनी अजय सलागरे विरुद्ध निलेश कुंभार यांच्यासह अनिल दळवी विरुद्ध अनिल मालुसरे यांच्या लढतीसाठी मतदान केले.

लोहारे जि.प. गटांतर्गत कोतवाल बुद्रुक पं.स. गटातील काटेतळी, सडवली, चोळई, कोंढवी, महालगूर, ओंबळी, कोतवाल खुर्द, परसुले, कोतवाल बुद्रुक-१, २, पैठण, भोगाव खुर्द, महाळुंगे, मोरगिरी, फौजदारवाडी, धामणदिवी, देवपूर, पळचिल, गोळेगणी येथील मतदारांनी कृष्णा कदम (कमळ), अ. रझाक करबेलकर (हात), चंद्रकांत कळंबे (शिवसेना), कृष्णा कदम (ढोबळी मिरची) या उमेदवारांसह पंचायत समितीच्या कोतवाल गणातील सुरेंद्र चव्हाण आणि अविनाश शिंदे यांचे भवितव्य मतपेटीत बंद केले. याच गटातील लोहारे पंचायत समिती गणात सवाद, सवाद-२, कणगुले, पार्ले, लोहारे-१, लोहारे-२, चरई, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, तुर्भे खोंडा, वझरवाडी, दिविल येथील मतदारांनी युगज्ञा दीपक उतेकर विरुद्ध अनिता अनिल भिलारे यांच्या लढतीसाठी मतदान केले.

तालुक्यातील सर्व मतदान केंद्रांच्या १०० मीटर परिघाबाहेर लक्झरी बस, कार, जीप आणि छोट्या प्रवासी वाहनांची मोठी गर्दी दिसून आली. सुमारे ७० टक्के मतदार बाहेरगावी वास्तव्यास असल्याने त्यांच्या वाहतुकीवरील खर्च सर्वसामान्य उमेदवारांना परवडणारा नसल्याची भावना व्यक्त होत आहे. यामुळे भविष्यात ग्रामपंचायत, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतील अनावश्यक खर्च टाळण्यासाठी बाहेरील मतदारांना पोस्टल मतदानाची सुविधा देणे किंवा मतदार ओळखपत्र आधारकार्डशी लिंक करून एकाच ठिकाणी मतदानाची व्यवस्था करण्याची गरज व्यक्त होत आहे.

पोलादपूर तालुक्यात मुंबईतील मतदार उमेदवारीसाठी येतात, तर ग्रामीण भागातील मतदार असलेले कार्यकर्ते नगरपंचायतीसाठी उमेदवार होतात. काही मतदारांना मुंबई व ठाणे महानगरपालिकांमध्ये उमेदवारी मिळून ते तेथे नगरसेवकही झाले आहेत.



# कोलाड-रोहा मार्ग उखडला

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ जवळील कोलाड नाक्यावर, कोलाडरोहा मार्गावरील द. ग. तटकरे चौकासमोर मुख्य रहदारीच्या ठिकाणी रस्ता उखडल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक दिवसांपासून हा उखडलेला भाग तसाच पडून असल्याने, अपघात घडल्यावरच दुरुस्ती होणार का? असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

या ठिकाणी रस्ता खराब झाल्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागत आहेत. परिणामी, वाहने मंदगतीने जावी लागत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते. मुरुड-कोलाड-ताम्हाणीमार्गे पुणे या महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरण उत्कृष्ट झाले असले तरी द.ग. तटकरे चौकासमोरील सुमारे २०० मीटरचा भाग काँक्रिट न केल्याने येथे वारंवार खड्डे निर्माण होत आहेत. हा भाग अनेकदा भरला जातो, मात्र टिकत नसल्याने पुन्हा उखडतो आणि नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. धाटाव एमआयडीसी, रोहा, मुरुड, अलिबाग, मुंबई, गोवा, पुणे आदी ठिकाणी ये-जा करणारी मोठ्या प्रमाणातील वाहतूक या मार्गावरून होते. तसेच कोलाड नाका हे बाजारपेठेचे मुख्य केंद्र असल्याने ७० ते ७२ खेड्यांतील नागरिक येथे येत असतात. शाळा-महाविद्यालयात जाणारे विद्यार्थीही याच मार्गाचा वापर करतात.



# लोकशाहीच्या रक्षणासाठी आरएसपीचा मोफत पहारा

## रस्ता सुरक्षा दलाचे पोलिसांना सहकार्य

**। चौल । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी रस्ता सुरक्षा दल (आरएसपी) रायगडचे पदाधिकारी सक्रिय झाले होते. रायगड तालुका समादेशक आर.डी. म्हात्रे, अतिरिक्त समादेशक श्री. राठोड तसेच रायगड समादेशक आर.डी. नाईक यांनी रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत सेवाभावी वृत्तीने पोलीस दलाला सहकार्य केले.

निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मतदारांना सुरक्षित वातावरणात मतदान करता यावे आणि परिसरात शांतता राखली जावी यासाठी आरएसपीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांसोबत समन्वय साधत विविध भागांत पाहणी केली. लोकशाहीच्या रक्षणासाठी मोफत पहारा देत आरएसपीच्या या सेवाभावी उपक्रमाचे नागरिकांकडूनही कौतुक करण्यात आले. पोलीस यंत्रणेला मदत करत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्वयंप्रेरणेने पुढाकार घेतल्यामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# १०३ वर्षांची नामुबाई घरत ठाम

**। उरण । प्रतिनिधी ।**

लोकशाही ही फक्त घोषणा नसून ती जिवंत आहे, हे उरण तालुक्यातील नवघर जे.एन. पी.टी. वसाहतीत राहणाऱ्या १०३ वर्षीय नामुबाई रामा घरत यांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. वयाची शंभरी गाठून नामुबाई घरत यांचे नाव



आजही मतदार यादीत ठामपणे नोंदलेले असून, मतदानाचा हक्क बजावण्याची त्यांची जिद्द अनेक तरुणांना लाजवणारी आहे. विधानसभा मतदारसंघ क्रमांक १९० उरण, भाग क्रमांक १८८ नवघर जे.एन. पी.टी. कॉलनी येथे त्यांचे नाव अधिकृत मतदार यादीत नोंद असून, १९२३ साली जन्मलेल्या या ज्येष्ठ महिलेने लोकशाहीवरचा विश्वास अजूनही तसूभरही ढळू दिलेला नाही. त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.



# भीषण आगीत होरपळलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची उब

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

प्रभाग क्रमांक १८ मधील गणेशनगर १ एस, शबरी हॉटेलच्या मागील परिसरात ५ फेब्रुवारी रोजी लागलेल्या भीषण आगीत सात झोपड्या जळून खाक झाल्या. या दुर्घटनेत सात कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, मोठे आर्थिक नुकसान झाले. आगीत विद्यार्थ्यांचे वह्या, पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्यही नष्ट झाले. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा तोंडावर असताना त्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, या उद्देशाने नगरसेविका डॉ. सुरेखा विलास मोहोकर यांनी पुढाकार घेत पीडित विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके, वह्या आणि आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तसेच मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन्सही देण्यात आले.

आमच्याकडून शक्य ते सर्व सहकार्य केले जाईल. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जे काही करता येईल, ते नक्की करू, अशी भावना डॉ. मोहोकर यांनी व्यक्त केली. या मदतकार्यावेळी डॉ. विलास मोहोकर, मनीषा परदेशी, मृणाल विचारे, जाधव काकू, जगदीश चव्हाण आणि गणेश खोत उपस्थित होते. नगरसेविकेच्या या सामाजिक बांधिलकीचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले.

# भरसमुद्रात तीन मोठी जहाजं पकडली

## तटरक्षक दलाच्या कारवाईनं खळबळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय तटरक्षक दलानं मुंबईजवळ समुद्रात मोठी कारवाई केली आहे. तेलाची तस्करी करणारी तीन जहाजं तटरक्षक दलानं पकडली आहेत. या जहाजांमध्ये मोठ्या प्रमाणात तेल साठा होता. ही परदेशी जहाजं समुद्रात तेलाची तस्करी करत होती. शुक्रवारी एका जटिल समुद्र-हवाई नेटवर्कवर आधारित ऑपरेशनच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय तेल तस्करी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

रॅकेटचा भाग असलेल्या जहाजांनी संघर्षग्रस्त देशांमधून मोठ्या प्रमाणात स्वस्त तेल आणि तेल आधारित वस्तूंची तस्करी करुन आर्थिक फायदा कमावण्याचा मार्ग निवडला होता. ही जहाजं आंतरराष्ट्रीय समुद्रात वस्तूंची देवाणघेवाण करायची. या सिंडिकेटमध्ये काम करणारे हस्तक अनेक देशांमध्ये सक्रिय आहेत. जहाजं खोल समुद्रात असताना त्यांच्यात समन्वय राखण्याचं काम हस्तकांकडून केलं जातं.

गुरुवारी मुंबईपासून जवळपास १०० नॉटिकल मैलांवर पश्चिम दिशेला भारतीय तटरक्षक दलानं तीन जहाजं थांबवली. तटरक्षक दलाचे कर्मचारी या जहाजांवर गेले. त्यांची झडती घेण्यात आली. कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. चालक पथकाची चौकशी केली गेली. त्यातून जहाजांचा वापर तेलाच्या तस्करीसाठी होत असल्याचं स्पष्ट झालं.

भारतीय तटरक्षक दलाच्या टेक-इन्क्लुसिव्ह सिस्टिमनं एका मोटर टँकरचा शोध घेतला. या टँकरच्या हालचाली संशयास्पद होत्या. त्यामुळे जहाजाच्या हालचालींचा डिजिटल तपास सुरु करण्यात आला. त्या जहाजाच्या आसपास असलेल्या अन्य जहाजांचा डेटा पॅटर्न तपासण्यात आला. दोन अन्य जहाजांवरील हालचालीदेखील संशयास्पद आढळून आल्या. त्यांच्याकडून समुद्रात तेलाशी संबंधित वस्तूंची तस्करी सुरु होती. ही जहाजं भारताच्या सागरी सीमा असलेल्या राज्यांमधील शुल्क चुकवण्याचा प्रयत्न करत होती.

भारतीय तटरक्षक दलाच्या पथकानं जहाजांवर जाऊन डिजिटल पुरावे तपासले. त्यानंतरही तीनही जहाजं ताब्यात घेण्यात आली. पुढील कारवाईसाठी या जहाजांना मुंबईत आणलं जाणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास भारतीय सीमा शुल्क विभागाकडून केला जाईल. समुद्र किनारा लाभलेल्या राज्यांकडून कोणतीही कारवाई होऊ नये यासाठी जहाजांची ओळख वारंवार बदलली जायची. या जहाजांचे मालक परदेशी नागरिक आहेत.

# कर्जतमध्ये तणावाखाली शांततेत मतदान

**■ पाच ठिकाणी बॅलेट युनिटमध्ये बिघाड**

**■ सरासरी ७० टक्के मतदानाचा अंदाज**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषद आणि तालुका पंचायत समिती मध्ये मतदान प्रक्रिया पार पडली.नेरळ मध्ये तणावाची स्थिती वगळता अन्यत्र शांततेत मतदान सुरू होते.पाच ठिकाणच्या बॅलेट युनिटमध्ये किरकोळ बिघाड झाल्याने मतदान सुरळीत पार पडले. तालुक्यात २२० मतदान केंद्रांवर सरासरी ७० टक्के मतदानाची नोंद झाली आहे. तर निवडणूक लढविणारे जिल्हा परिषद गटाचे १८ आणि कर्जत पंचायत समितीचे २८ उमेदवार यांचे या निवडणुकीतील भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे.

कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेचे कळंब, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, कडाव आणि मोठे वेणगाव अशा सहा जिल्हा परिषद गट आणि कर्जत पंचायत समितीचे १२ गण यासाठी मतदान घेण्यात आले. कर्जत तालुक्यात २२० मतदान केंद्र येथे मतदान घेण्यात आले. मागील दोन महिने आधी झालेल्या कर्जत नगरपरिषद निवडणुकीत बिघाड झाले निवडणूक यंत्रणा मतदान यंत्र बाबत सतर्क झाली होती. त्यामुळे मतदान यंत्र यांची ईव्हीएम मशीन हे तपासणीपासून मतदान केंद्रावर जाईपर्यंत सावधगिरी बाळगण्यात आली होती.

# ‘राष्ट्रनिर्मितीत कामगार, युवाशक्तीचे योगदान महत्त्वाचे’

**। उरण । प्रतिनिधी ।**

पुरी (ओडिशा) येथे भारतीय मजदूर संघाच्या २१व्या त्रैवार्षिक अखिल भारतीय अधिवेशनाचे उद्घाटन केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या हस्ते झाले. ६ ते ८ फेब्रुवारीदरम्यान स्व. ओमप्रकाश अग्रवाल सभागृहात सुरू असलेल्या या अधिवेशनात देशातील २८ प्रांतांमधून सुमारे २,५०० प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.




याप्रसंगी बोलताना डॉ. मांडवीय म्हणाले की, राष्ट्राच्या पुनर्निर्माण आणि विकासात कामगार व युवाशक्तीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न त्यांच्या कष्ट, क्षमता आणि समर्पणातूनच साकार होऊ शकते. केंद्र सरकारने लागू केलेले नवे कामगार कायदे समान वेतन, सामाजिक सुरक्षा आणि भेदभावमुक्त वातावरण देणारे असल्याचे त्यांनी सांगितले. बीएमएसचे अखिल भारतीय अध्यक्ष हिरण्मय पंड्या यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत, बीएमएस ही देशातील अग्रगण्य कामगार संघटना असल्याचे नमूद केले. अधिवेशनाची सुरुवात ध्वजारोहण व दीपप्रज्वलनाने झाली. व्यासपीठावर आरएसएसचे बी. भागय्या, रशियातील एफएनआरपीचे अध्यक्ष सर्गेई चेर्नोगायेव, आयएलओ प्रतिनिधी मिसिको मियामोटो, तसेच बीएमएस पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रातून १९८ पदाधिकारी अधिवेशनात सहभागी झाले आहेत. या अधिवेशनात कामगार, विशेषतः कंत्राटी कामगारांच्या समस्यांबाबत महत्त्वाचे प्रस्ताव मांडले जाणार आहेत.

विविध देशांतील कामगार संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित आहेत. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी ‘वंदे मातरम्’ सादर केले.

## पान १ वरून

### राज्यात भरघोस मतदान

आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत १२ जिह्यात सुमारे ७० ते ७५ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, कोल्हापूर जिल्हयात सर्वाधिक ८० टक्केच्या पुढे मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. संध्याकाळी साडेपाच वाजता मतदानाची वेळ संपली असली तरी त्यावेळीही काही मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या रांगा होत्या. त्यामुळे मतदानाची अंतिम ठक्केवारी वाढण्याची शक्यता वर्तविली आहे. या सर्व ठिकाणी सोमवारी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होणार असून दोन तासात निकालाचे चित्र स्पष्ट होईल.

**वैद्यकीय किटची सुविधा**

सध्या थंडीचा हंगाम असला तरी दुपारच्या कडक उन्हाचा विचार करून मतदान केंद्रांवर मतदारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्हा रुग्णालय व आरोग्य विभागाकडून वैद्यकीय किटची व्यवस्था करण्यात आली होती. आशा वर्कर, आरोग्य सेविका आणि इतर आरोग्य कर्मचारी मतदान केंद्रांवर तैनात होते. अनेक केंद्रांवर वैद्यकीय कक्षही उभारण्यात आले होते.

**मान्यवरांनी बजावला मतदानाचा हक्क**

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सुरेंद्र म्हात्रे, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, सानिका घरत, कावीर पंचायत समितीचे उमेदवार अनिल पाटील, शेतकरी सभा तालुका अध्यक्ष अनिल पाटील, शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, मापगावचे उमेदवार राजाभाऊ ठाकूर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, निखिल मयेकर, मोहन धुमाळ, अंजली पाटील, संदीप गायकवाड यांच्यासह विविध भागातील महाविकास आघाडी व शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुण तसेच विविध संस्थांचे आजी-माजी सदस्य यांनी मतदानाचा हक्क बजावला.

**आशा सेविकांची नाराजी**

जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान काही मतदान केंद्रांवर नियुक्त आशा सेविकांना आरोग्य किट उपलब्ध न झाल्याचा आणि मानधन न मिळाल्याचा आरोप समोर आला आहे. दिवसभर बूथवर उपस्थित राहूनही नाव व पद नोंद नसल्याने तसेच स्पष्ट सूचनांचा अभाव असल्याने सेविकांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. इतरांना मानधन मिळाले, मात्र आम्हाला मिळाले नाही, अशी तक्रार काही सेविकांनी केली. निवडणुकीसारख्या जबाबदारीच्या कामात आवश्यक सुविधा न मिळाल्यास कामावर परिणाम होऊ शकतो, अशी भावना व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने चौकशी करून स्पष्टता द्यावी, अशी मागणी होत आहे.

### जिल्ह्यात ७५ टक्के मतदान

तासानंतर मतदान प्रक्रिया पूर्ववत सुरू करण्यात आली.

दोन-दोन तासांच्या अंतराने मिळालेल्या आकडेवारीनुसार, सकाळी साडेसात ते साडेनऊ या वेळेत ११.५ टक्के, साडेअकरा वाजेपर्यंत २७.५२ टक्के, दुपारी दीड वाजेपर्यंत ४४.८६ टक्के आणि साडेतीन वाजेपर्यंत ५७.७७ टक्के मतदान झाले. एकूण १७ लाख ३८१ मतदारांपैकी साडेसात ते साडेतीन या वेळेत ९ लाख ८२ हजार ३७४ मतदारांनी मतदान केले. यामध्ये ४ लाख ९१ हजार ४०२ पुरुष आणि ४ लाख ९० हजार ९६९ महिला मतदारांचा समावेश आहे. महिलांपेक्षा ४३३ पुरुषांनी दुपारपर्यंत अधिक मतदान केल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले.

### वाढीव वेतनाचा हप्ता गायब!

एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढीचा फरक दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून सरकारकडून ही रक्कम प्राप्त झालेली नाही.

महामंडळाने २० जानेवारी रोजी राज्य सरकारकडे तीन महिन्यांच्या एकूण ११६.६९ कोटी रुपयांच्या निधीबाबत पत्र पाठवले होते. मात्र निधी न मिळाल्याने व्यवस्थापनाने वाढीव वेतनाचा फरक या महिन्यात न देण्याचा निर्णय घेतला. परिणामी कर्मचाऱ्यांना फरकाविना वेतन देण्यात आले.

एसटीवर सध्या ४२०० कोटी रुपयांची वैधानिक देणी प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत वाढीव वेतनाचा हप्ता न देणे ही कर्मचाऱ्यांची अवहेलना असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. येत्या तीन दिवसांत सरकारने निधी न दिल्यास रीतसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला आहे. राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या या प्रश्नामुळे आगामी काळात वातावरण अधिकच तापण्याची शक्यता आहे.

# सुधागडमध्ये मतदानाचा उत्साह

**■ पाली शहरात मात्र शांतता**

**■ स्थलांतरित मतदारांची भूमिका ठरणार कळीची**

**। पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी शनिवारी (ता. ७) सकाळपासूनच मतदारांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. दुपारी दीड वाजेपर्यंत तालुक्यात सरासरी ४३.५ टक्के मतदान झाले होते, दुपारनंतरही मतदान केंद्रांवर रांगा कायम होत्या. ही निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत चुरशीची मानली जात असून अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. तालुक्यात ९ झोनअंतर्गत एकूण ७५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. मुंबई-रायगड युनिटचे ११० होमगार्ड, ६६ पोलीस कर्मचारी, ६ अधिकारी आणि पुणे युनिटकडून एसआरपीएफची एक तुकडी तैनात करण्यात आली होती.



**बँकांना सुट्टी**

पालीत मतदान नसले तरी एसबीआय व एचडीएफसी बँक सोडून इतर बँकाना सुट्टी जाहीर केल्याने त्या बंद होत्या. त्यामुळे व्यापारी व सर्वसामान्य ग्राहकांचे व्यवहार ठप्प झाले होते. याबाबत अनेकांनी नाराजी देखील व्यक्त केली.

**पालीत शांतता**

पाली नगरपंचायत स्थापन झाल्यानंतरची ही पहिलीच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक होती. पाली आता नागरी क्षेत्र घोषित झाल्यामुळे येथील मतदारांची नावे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदार संघातून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे या निवडणुकीत पालीतील नागरिक मतदान केले नाही. यामुळे अनेक वर्षांपासून ग्रामीण राजकारणात सक्रिय असलेल्या मतदारांमध्ये काहीसा हिरमोड झालेला दिसला, तसेच शहरात शांततेचे वातावरण होते.

**स्थलांतरित मतदारांची निर्णायक भूमिका**

या निवडणुकीत मुंबई, पुणे आणि ठाणे यांसारख्या शहरांत कामानिमित्त गेलेले स्थलांतरित मतदार महत्त्वाची भूमिका बजावताना दिसत आहेत. आदिवासी आणि इतर स्थलांतरित मतदारांना एकत्रित आणण्यासाठी उमेदवारांनी मोठे प्रयत्न केले होते. या मतदारांचा कौल कोणाच्या पारड्यात पडतो, यावरच विजयाचे गणित अवलंबून असणार आहे.

# तळा तालुक्यात शांततेत मतदान

**। तळा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी शनिवारी तळा तालुक्यात शांततेत मतदान पार पडले. सकाळपासूनच गावातील मतदारांसह मुंबईवरून आलेल्या मतदारांचा उत्साह पहायला मिळाला. रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी तळा तालुक्यात एकूण ३२,१२२ मतदार असून ज्यामध्ये १५,८९५ पुरुष मतदार व १६,२२७ महिला मतदारांचा समावेश आहे. त्यापैकी ५१.८३ टक्के नागरिकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत सुरळीत मतदान पार पडले असून, उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. तालुक्यातील जनतेने कोणत्या पक्षाच्या उमेदवारांना भरभरून मतदान केले आहे हे सोमवारी स्पष्ट होईलच.मात्र, राजकीय पक्षाच्या उमेदवारांकडून बेरजेची जुळवाजुळव करण्यास सुरुवात झाली आहे.यावेळी

तालुक्यातील एकही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनातर्फे तालुक्यात ५२ ठिकाणी मतदान केंद्रे उभारण्यात आली होती.

# अलिबागमध्ये महिला मतदार आघाडीवर

## दुपारी साडेतीन वाजेपर्यंत एकूण ६०.३५ टक्के मतदान; आदिवासी वाड्यांसह ज्येष्ठ नागरिकांचे उत्स्फुर्त प्रतिसाद

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ आणि पंचायत समितीच्या १४ जागांसाठी शनिवारी (दि.७) सकाळपासून २६१ मतदान केंद्रावर मतदान पार पडले. यावेळी दुपारी साडेतीन वाजेपर्यंत १ लाख २१ हजार ८५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून एकूण ६०.३५ टक्के मतदान झाले. त्यात ६० हजार ९०० पुरुष आणि ६० हजार ९५७ महिला मतदारांचा समावेश आहे. त्यामुळे मतदान करण्यामध्ये पुरुषांपेक्षा महिला आघाडीवर असल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले.

अलिबाग तालुक्यामध्ये शहापूर, आंबेपूर, आवास, थळ, चेंढरे, चौल व कावीर असे ७ जिल्हा परिषद गट, तसेच वैजाळी, शहापूर, आंबेपूर, रुईशेत भोमोली, आवास, किहीम, थळ, वरसोली, चेंढरे, आक्षी, रेवदंडा, चौल, काविर व रामराज असे १४ पंचायत समिती गण आहेत. या निवडणुकीत २ लाख १ हजार ९२३ मतदारांचा समावेश आहे. त्यामध्ये ९८ हजार ८०६ पुरुष व १ लाख ३ हजार १७ महिला मतदार आहेत. यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती







निवडणुकीच्या रिंगणात एकूण ६३ उमेदवार आहेत. त्यात जिल्हा परिषदेचे २१ आणि पंचायत समितीचे ४२ उमेदवार आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यामध्ये शनिवारी सकाळी साडेसात वाजल्यापासून २६१ मतदान केंद्रावर मतदानाला सुरुवात झाली. काही मतदान केंद्रामध्ये सुरुवातीला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. परंतु, बामणगाव, सहाण, रामराज इत्यादी मतदार संघात चांगला प्रतिसाद दिसून आला. यावेळी मतदार स्वयंस्फुर्तीने घराच्या बाहेर पडून मतदान करण्यासाठी मतदान केंद्राकडे वळले होते. या निमित्ताने एक वेगळा उत्साह मतदारांमध्ये पहावयास मिळाला. आदिवासीवाड्यांमधील मतदारांनीदेखील मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर गर्दी केली होती.

सकाळी साडेआठ नंतर तालुक्यातील अनेक मतदान केंद्रावर मतदानासाठी रांगच रांग दिसून आली. साडेनऊ वाजेपर्यंत अलिबाग तालुक्यात १२.४३ टक्के झाले. त्यावेळी २५ हजार १०४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर सकाळी दीड वाजेपर्यंत मतदानासाठी रांगच रांग होती. कामार्ले येथील किरकोळ वाद वगळता तसेच सहाण येथील मतदान केंद्रातील बिघाडाची परिस्थिती पहाता, तालुक्यात मतदान प्रक्रीया सुरळीत पार पडली. सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास तालुक्यामध्ये ५७ हजार ८६७ (२८.६६ टक्के) मतदारांनी मतदान केले. त्यात २९ हजार ९५९ पुरुष आणि २७ हजार ९०८ महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. दुपारी दीड वाजेपर्यंत ९३ हजार ४९ (४६.८ टक्के) मतदारांनी मतदान केले. दुपारपर्यंत मतदानाच्या टक्क्यात भरमसाठ वाढ झाली. त्यामुळे हा आकडा दुपटीने वाढल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत २ लाख १ हजार ९२३ मतदारांपैकी १ लाख २१ हजार ८५७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून एकूण ६०.३५ टक्के मतदान झाले. त्यात ६० हजार ९०० पुरुष आणि ६० हजार ९५७ महिला मतदारांचा समावेश होता. त्यामुळे या कालावधीत पुरुषांपेक्षा महिला मतदानासाठी आघाडीवर अल्याचे दिसून आले.

### मतदानावर दृष्टीक्षेप

- वेळ–टक्के–पुरुष–महिला–एकूण केलेले मतदान
- ७.३० ते ०९.३०– १२.४३–१३,८९४– ११,२१०– २५,१०४
- ०९.३० ते ११.३०– २८.६६–२९,९५९– २७,९०८– ५७,८६७
- ११.३० ते १.३०– ४६.०८–४६,५६७– ४६,४८२–९३,०४९
- १.३० ते ३.३०– ६०.३५–६०,९००– ६०,९५७– १,२१,८५७

## डोंगर चढून लोकशाही जपली





**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात मतदान केंद्रातील कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कसोशीने काम केले. मतदान हे सर्वश्रेष्ठ अधिकार व कर्तव्य मानून प्रशासनाकडून विशेष उपाययोजना राबवण्यात आल्या. यावेळी पनवेलमधील माची प्रबळ सारख्या अतिदुर्गम व डोंगराळ भागातही मतदान केंद्र सुरू करण्यात आली आहेत. डोंगर चढून निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ईव्हीएम यंत्रे व आवश्यक साहित्य सुरक्षितपणे मतदान केंद्रांवर पोहोचवले. अवघड रस्ते, निसर्गमय वातावरण आणि प्रतिकूल परिस्थिती असूनही कर्मचाऱ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. दुसरीकडे, सकाळपासूनच मतदार राजाने मतदान केंद्रांकडे वाट धरली. दुर्गम भागातील नागरिकांनीही लोकशाहीच्या या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



● अलिबाग तालुक्यातील सुतारपाडा मतदान केंद्रावर कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक उडाल्याने पोलीस आणि एस.आर.पीएफ. यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. (छायाचित्रः समीर मालोदे)

## कर्जतमध्ये बॅलेट युनिटमध्ये बिघाड

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषदेचे कळंब, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, कडाव आणि मोठे वेणगाव अशा ६ जिल्हा परिषद गट आणि कर्जत पंचायत समितीचे १२ गण यासाठी मतदान पार पडले. कर्जत तालुक्यात २२० मतदान केंद्र येथे मतदान घेण्यात आले. मागील दोन महिने आधी झालेल्या कर्जत नगरपरिषद निवडणुकीत बिघाड झाले निवडणूक यंत्रणा मतदान यंत्र बाबत सतर्क झाली होती. त्यामुळे मतदान यंत्र यांची ईव्हीएम मशीन हे तपासणी पासून मतदान केंद्रावर जाई पर्यंत सावधगिरी बाळगण्यात आली.

तरी देखील मतदान प्रक्रिया सुरू झाल्यानंतर मॉक पोल दरम्यान नेरळ जिल्हा परिषद गट मधील नेरळ कुंभारआळी शाळा येथे असलेल्या मतदान केंद्रावरील बॅलेट युनिट मध्ये बिघाड झाला. दुसरीकडे माणगाव तर्फे वरेडी जिल्हा परिषद गट मधील आंबिवली, कोल्हारे, यांच्याबरोबर कडाव जिल्हा परिषद गट मधील नसरापूर आणि चांदइ अशा चार मतदान केंद्रातील मतदान यंत्र तेथे बॅलेट युनिट बदलावे लागले.

### उमेदवारांनी केले मतदान



सुरेंद्र म्हात्रे



अभिषेक पाटील



सानिका थळे, श्वेताली थळकर



अजित कासार



नयना शिळदणकर



राजश्री मिसाळ



अनया फुंडे



अंजली पाटील

## नागोठण्यात दुपारनंतर उत्स्फूर्त प्रतिसाद





**| नागोठणे | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नागोठणे गटाच्या आणि रोहा पंचायत समितीच्या नागोठणे गण व सुकेळी गणाच्या निवडणूक मतदान प्रक्रियेत नागोठणे शहर व विभागात सकाळपासून शांततेत मतदान सुरू झाले. जिल्हा परिषदेच्या नागोठणे शहरातील १३ तसेच ग्रामीण विभागातील २९ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. नागोठणे शहरातील १३ मतदान केंद्रांमध्ये कचेरी शाळेतील ४ मतदान केंद्र, राजिप कन्या शाळेतील ३ मतदान केंद्र, नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूल मध्ये ३ मतदान केंद्र तसेच कोळीवाडा येथील राजिप उर्दू शाळेतील ३ मतदान केंद्रांमध्ये मतदान प्रक्रिया सुरळीत झाली. सकाळच्या सत्रात मतदारांनी काही प्रमाणात गर्दी केली होती. दुपार नंतर सर्वच मतदान केंद्रांवर मतदारांनी गर्दी केली होती.

## तरूणांनी बजावला मतदानाचा हक्क

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद व पंचायत समितीचे मतदान शनिवारी (दि.७) पार पडले. यापूर्वी मतदारांमध्ये समाज माध्यमांसह विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात आली. त्यामुळे आपण केलेल्या मतदानातून आपल्या जिल्ह्यासह तालुक्याचा आणि गावाचा विकास होणार असल्यामुळे प्रत्येकाच्या मनामध्ये मतदानाविषयी चांगला भाव निर्माण झाला आहे. त्यामुळे पाताळगंगा परिसरातील नागरीक मोठ्या उत्साहाने मतदान करण्यासाठी घराबाहेर पडले. आजचे राजकारण तरुणांच्या खांद्यावर असल्यामुळे रॅली तसेच जाहिर संभांमध्ये तरुण वर्गांचा मोठ्या प्रमाणात समावेश दिसून आला. विविध माध्यमांतून तरूण वर्गात जनजागृती करण्यात आली. त्यामुळे त्यांनाही मतदानाचा अधिकार आणि महत्त्व पटले आहे. सुट्टीचा दुरूपयोग न करता पाताळगंगा परिसरातील तरूण वर्गासह कामगार, गृहीणी आणि ज्येष्ठ नागरिकांनी मतदानांचा हक्क बजाविला.



## माणगाव तालुक्यात कडेकोट बंदोबस्त



**| माणगाव | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी माणगाव तालुक्यातील निजामपूर, तळाशेत, मोर्बा, गोरेगाव जिल्हा परिषद गट व पाटणूस, निजामपूर, तळाशेत, साई, वडवली, मोर्बा, गोरेगाव व लोणेरे पंचायत समिती गणासाठी शनिवारी शांततेत मतदान झाले. माणगाव तालुक्यातील सर्व मतदान केंद्रावर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे व माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्याने उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून कोण निवडून येणार याची उत्सुकता तालुक्यातील जनतेला लागून राहिली आहे.

## पाणजे मतदार केंद्रावर संभ्रम निर्माण

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण येथील रायगड जिल्हा परिषदेच्या ४ जागांसाठी १४ उमेदवार, तर उरण पंचायत समितीच्या ८ जागांसाठी २३ उमेदवार उभे असून शनिवारी (दि.७) मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी एकूण १३५ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली.

निवडणूकी दरम्यान कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी आविशकुमार सोनोने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी हे जातीने लक्ष घालून होते. त्यामुळे किरकोळ बाचाबाचीचे प्रकार वगळले तर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. यादरम्यान उरण तालुक्यातील नवघर जिल्हा परिषदेच्या पाणजे मतदान केंद्रावर मतपेटीमध्ये आवाज येत नसल्याने थोडावेळ मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.

मंडप सजला, बँड वाजू लागला, वरात निघाली.. पाऊल आधी वळलं ते मतदान केंद्राकडे!

## आधी लगीन लोकशाहीचे... मगच माझं!

**| नेरळ, रोहा, अलिबाग | प्रतिनिधी |**

लग्नाच्या शुभमुहूर्ताची धावपळ, पाहुण्यांची लगबग, वाजतगाजत निघालेली वरात आणि पारंपरिक पोशाखातील नवरदेव-नवरी.. असे उत्साही वातावरण जाधव, धुळे, नाईक, माटे आणि घरत परिवारात होते. या साऱ्या उत्सवी वातावरणातही बोहल्यावर चढण्यापूर्वी आणि मांडवात जाण्याआधी या नवदांपत्यांनी लोकशाहीच्या मंदिरात जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. आयुष्याच्या नव्या प्रवासाची सुरुवात करताना देशाप्रती असलेली जबाबदारी पार पाडणाऱ्या या नवदाम्पत्यांनी समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा केला.

धाटाव गावातील राजेंद्र जाधव यांचे सुपुत्र वृतिक जाधव यांचा विवाह वांदोली येथील चिंतामणी कडव यांच्या कन्या काश्मिरी हिच्याबरोबर थाटामाटात पार पडत असताना, वृतिकने बोहल्यावर जाण्यापूर्वी लोकशाहीच्या मंचावर जाऊन मतदान करण्याचा निर्धार केला. पारंपरिक पोशाखात चेहऱ्यावर आत्मविश्वासाचे हास्य घेऊन तो मतदान केंद्रावर पोहोचला. उपस्थित मतदारांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. लग्नातील पहिल्या फोटोइतकाच नव्हे तर, त्याहून अधिक महत्त्व या मतदानाच्या क्षणाला प्राप्त झाले. या प्रसंगाने नरवीर तानाजी मालुसरे यांच्या ''आधी लगीन कोंडाण्याचे'' या शब्दांची आठवण उपस्थितांना झाली.

नेरळ परिसरातील आत्रंड नीड गावातील संदेश धुळे हाही आपल्या लग्नासाठी पनवेलकडे वरात घेऊन निघाला होता. ब्रास बँडच्या गजरात निघालेली वरात रस्त्यातील जिल्हा परिषद शाळा आत्रंड नीड येथील मतदान केंद्राजवळ थांबली. लग्नाला उशीर होईल याचा विचार न करता संदेश, त्यांचे वडील सुरेश दामू धुळे, आई संगीता धुळे आणि भाऊ आदेश धुळे यांनी प्रथम मतदान करून नंतर पुढील प्रवास सुरू केला. ''प्रथम देश, मग सोहळा'' हा संदेश त्यांनी कृतीतून दिला.

याच धर्तीवर संकेत विजय नाईक या नवरदेवाने बोहल्यावर चढण्यापूर्वी परहूर पाडा मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला. लग्नाच्या शुभक्षणापूर्वी लोकशाहीप्रती कर्तव्य पार पाडणे त्याने महत्त्वाचे मानले.









तसेच, नवरी मुलगी मानसी शशिकांत घरत हिनेही नेहुली येथील मतदान केंद्रावर जाऊन मतदान करून समाजासमोर वेगळा आदर्श ठेवला. लग्नाच्या तयारीत असतानाही तिने मतदानाला प्राधान्य दिले. पनवेल येथील नवरदेव विराज माटे यानेसुद्धा मतदानाला प्रथम प्राधान्य दिले. ''लग्न आयुष्यात एकदाच येते, पण लोकशाही टिकवण्यासाठी मतदान हे तितकेच महत्त्वाचे आहे,'' अशी भावना विराजने व्यक्त केली. त्याच्या या कृतीचे उपस्थित नागरिक, मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी मनापासून कौतुक केले.

या सर्व घटनांमधून एकच संदेश अधोरेखित झाला आहे. तो म्हणजे, लग्नाचा आनंद असो वा आयुष्यातील कोणताही मोठा प्रसंग, लोकशाहीबद्दलची आपली जबाबदारी विसरून चालणार नाही. या नवरदेव-नवरींनी ''आधी लगीन लोकशाहीचे, मगच माझे'' हा संदेश कृतीतून समाजापुढे ठेवत खऱ्या अर्थाने आदर्श नागरिकत्वाचे दर्शन घडवले आहे.



## निवडक



### आंबेवाडी येथे रक्तदान शिबीर

**कोलाड :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्र अलिबाग यांच्या संयुक्ताने ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी दहा ते दुपारी एक या वेळेत आंबेवाडी येथील एम.पी.एस.एस इंग्लिश मेडीयम स्कूल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यात योगदान देण्यासाठी आणि रक्तदानाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होण्यासाठी शाळेने एक स्तुत्य उपक्रमाचे म्हणजेच रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.या रक्तदान शिबिरामध्ये जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी रायगड येथील डॉक्टर गोसावी तसेच त्यांची टीम यांच्या संयोजनाने त्याचप्रमाणे एम.पी.एस.एस. इंग्लिश मेडीयम स्कूल येथील मुख्याध्यापिका सौ वैशाली महाडिक मॅडम यांच्या नियोजनाने शाळेतील शिक्षकांच्या सहकार्याने आणि या शाळेतील विद्यार्थी,पालक तसेच सुजाण नागरिक यांच्या मदतीने आनंदी वातावरणात रक्तदान शिबीर पार पडला सदर शिबिरात ३० नागरिकांनी रक्तदान केले. यावेळी रायगड जिल्हा प्राथमिक आरोग्य केंद्र अलिबाग येथील डॉ.गोसावी व त्यांची टीम,एम.पी.एस एस चे शिक्षक,विद्यार्थी,पालक,कोलाड तसेच रोहा येथील काही सामाजिक कार्यकर्ते, पोलीस वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीर मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. शाळेच्या वतीने सर्व उपस्थित्यांचे आभार मानण्यात आले.

### सुक्या मासळीसाठी बाजारात गर्दी

**ठाणे :** जेवताना दोन घास अधिक जाण्यासाठी खरपूस भाजून तोंडी लावण्याचा प्रकार व गरिबांच्या जेवणातील चविष्ट भाजीचा प्रकार म्हणून वर्षभर साठवणूक करून वापरण्यात येणाऱ्या सुक्या मासळीची वसई तालुक्याच्या आठवडे बाजारात सध्या मोठी आवक होत आहे. येथील आठवडे बाजारात मच्छिमार मोठ्या प्रमाणात सुकी मच्छी विक्रीसाठी घेऊन येत आहेत. यामध्ये हिवाळ्यात सुकवलेल्या सुक्या मच्छीचा दर्जा चांगला असल्याचे सांगितले जात असल्याने बाजारात खवय्यांच्या पसंतीस ही मच्छी उतरत आहे. जास्त प्रमाणात आदिवासी व शेतकरी यांच्या कडून सुक्या मच्छीला मोठी मागणी असून कामकाजानिमित्त येथे स्थलांतरित झालेला मजूर वर्गही सुक्या मच्छीचा खवय्या आहे. त्यात हिवाळ्यात सुकवलेल्या मच्छीचा दर्जा हा खूपच चांगला असतो. मांदेली, बोंबील, सुकट, जवळा, वाकटी, पाखट, बांगडा, घोळीचा खारा, आदी मासळी बाजारात आली आहे. मात्र दरसाल वाढणाऱ्या महागाईचा फटका मासळी खरेदीदारांना बसत असून मागील वर्षी दीडशे ते तीनशेने घेतलेल्या बोंबिलांसाठी तीनशे ते पाचशे रुपये शेकडा मोजावे लागत आहेत. तसेच इतर सुक्या मच्छीचा भाव हा मागील वर्षीच्या तुलनेत १५ ते २५ टक्के वाढला आहे. मात्र तरीही कामकाजाच्या दिवसांत जेवणासाठी घरात साठवणूक असलेली कमी मेहनतीची व चविष्ठ भाजीचा एक प्रकार असल्याने आताच्या दिवसात सुकी मच्छी खरेदी करून ठेवावी लागत असल्याचे खरेदीदार सांगत आहेत. जी अजून काही प्रक्रिया करून साठवून ठेवून वर्षभर वापरता येते. मात्र दर्यात मासेमारी करताना लागणारे डिझल, मजूर व इतर बाबींचा होणारा वापर आणि दर्या सागरात त्यामानाने मिळणाऱ्या मासळीच्या प्रमाणात तफावत झाल्याने मासळी महाग झाल्याचे कोळी विक्रेत्या सांगत आहेत. सध्या येथील आठवडे बाजारात सुकी मच्छी मोठ्या प्रमाणात विक्रीकरिता आलेली दिसत आहे.



### नदीकिनाऱ्यावर अस्वच्छतेचा विळखा

**खेड :** जगबुडी नदीकिनारी शासकीय जागेत मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या उभ्या राहिल्या असून, निसर्गसौंदर्य लाभलेल्या या नदीकिनाऱ्याला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. या किनाऱ्यावरच पालिकेचे मटणमार्केट असून, त्यातून निर्माण होणारा ओला व सुका कचरा येथेच फेकला जातो. याबाबत पालिका प्रशासन अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. मच्छीमार्केट इमारत उपलब्ध असतानाही बंदरमार्गाच्या दुतर्फा दररोज मासळी बाजार भरत असून, या मार्गाने ये-जा करणाऱ्या पादचारी व वाहनचालकांना अडथळा शर्यत पार करावी लागते. जगबुडी किनाऱ्यावर अस्वच्छता, आरोग्यासाठी हानिकारक कचरा, अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांचा वाढता विळखा चिंतेची बाब आहे. जगबुडी नदीवरील भोस्ते पुलालगत पालिकेने गणेश विसर्जन घाट व प्रेक्षक गॅलरी लाखो रुपये खर्च करून उभारून किनाऱ्याचे सुशोभीकरण केले आहे; मात्र या गणेशघाटापासून अवघ्या काही फूट अंतरावर असलेल्या अनधिकृत झोपडपट्ट्या व त्यामधून बाहेर पडून उघड्यावर शौचास बसणारे समाजकंटक या कारभाऱ्यांना दिसून येत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. स्वच्छता अभियान राबविताना केवळ काही दिवसांकरिता दाखविलेला सुज्ञपणा प्रशासन व नागरिकांनीदेखील सोडून दिल्याचे निदर्शनास येत आहे.पालिका प्रशासनाने मच्छी-मटणमार्केट उभारण्यासाठी लाखो रुपये खर्च केले आहेत; मात्र त्या इमारतीत मासे विक्रेत्यांना बसविण्यात पालिका प्रशासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे बंदरमार्गाच्या दुतर्फा उघड्या व सार्वजनिक जागेत मासळी विक्री सुरू असल्याचे दिसून येते.

### अलिबाग जिल्हा न्यायालयात ई-सेवा केंद्राचे उद्घाटन

**रायगड :** अलिबाग येथील जिल्हा न्यायालयात शुक्रवारी (दि. ६) सकाळी नवीन ई-सेवा केंद्राचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश आर. डी. सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जिल्हा न्यायालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर नव्याने सुरू करण्यात आलेल्या नक्कल शाखेचेही उद्घाटन करण्यात आले. या नक्कल शाखेमुळे जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) तसेच मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयातील नक्कल कामकाज अधिक जलद व सुलभ होणार आहे. ई-सेवा केंद्रामुळे पक्षकार, वकील व नागरिकांना खटल्याची स्थिती, पुढील सुनावणीची तारीख, ऑनलाइन अर्ज, कागदपत्रांचे स्कॅनिंग, ई-स्वाक्षरी, ई-स्टॅम्प पेपर्स, ई-कोर्ट मोबाईल ॲपची माहिती तसेच बंदींना नातेवाइकांसोबत ई-मुलाखतीसाठी सहाय्य अशा विविध सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. यामुळे न्यायालयीन कामकाजात पारदर्शकता व गती वाढेल.

# शैक्षणिक साहित्य देऊनही गुणवत्ता वाढेना

## केंद्राच्या निधीचा सोशल ऑडिट करण्याचा निर्णय; शाळांची घेणार झाडाझडती

**| रायगड | प्रतिनिधी |**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत केंद्र सरकारकडून राज्य शासनाला गणवेश, पुस्तके आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विविध प्रकारच्या साहित्यासाठी कोट्यवधींचा निधी देण्यात येतो. मात्र, त्यानंतरही सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत अपेक्षेनुसार वाढ दिसूत येत नाही. त्यामुळे आता केंद्र सरकारने शाळा आणि विद्यार्थ्यांचे सामाजिक अंकेक्षण (सर्वेक्षण) करण्याचा निर्णय घेतला आहे.



त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यात एकाच वेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये हे सामाजिक सर्वेक्षण सुरू आहे. राज्यात सध्या १३ हजार शाळांमध्ये असे सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात संबंधीत नेमण्यात आलेले पथक हे शाळा पातळीवर जावून त्या ठिकाणी देण्यात आलेल्या निधीतून भौतिक सुविधा उभ्या राहिल्या की नाहीत. त्या ठिकाणी गणवेश, पाठ्यपुस्तके आणि अन्य शैक्षणिक साहित्य पोहच झाले की नाही. याची माहिती थेट विद्यार्थी, पालक यांच्याकडून घेत आहे.

या सामाजिक सर्वेक्षणात घेण्यात येणारी माहिती केंद्र सरकारने विकसीत केलेल्या ॲपमध्ये भरण्यात येत असून संबंधीत शाळेच्या व्यवस्थापन समितीसमोर घेण्यात आलेल्या माहितीचे वाचन करण्यात येत आहे. तपासणी करण्यात आलेल्या शाळांचे लवकर तालुका पातळीवर जनसुनावणी घेण्यात येणार आहे. राज्य सरकारने यासाठी महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शता सोसायटीसोबत सामंजस्य करार केला आहे. समग्र शिक्षण योजनेच्या अंतर्गत राज्यात ६५ हजार शाळांना दिल्या जाणाऱ्या लाभांचे अंकेक्षण होईल. पहिल्या टप्प्यात राज्यात १३ हजार शाळांमध्ये या सर्वेक्षणाचे काम सुरू आहे.

प्रत्येक जिल्ह्यातून एकूण शाळांच्या २० टक्के शाळांची यासाठी निवडही करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून शाळा दुरुस्ती, गणवेश, पुस्तके आणि इतरही कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्यात येतो. परंतु काही राज्यांकडून जिल्हास्तरावर वेळेत निधी देण्यात येत नाही. तर राज्याने वेळेत निधी दिल्यास शिक्षण विभागाकडून तो खालच्या स्तरावर वळता करण्यात येत नाही.

परिणामी विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके पहिल्यात दिवशी मिळत नाही. काही राज्यात विद्यार्थ्यांना एकच पुस्तक व गणवेश देण्यात आले. मात्र, कागदोपत्री सर्वच विद्यार्थ्यांना ते मिळाल्याचे दाखवण्यात आले. परंतु वस्तुस्थिती वेगळी होती. शाळेच्या दुरुस्तीसह नवीन बांधकामासाठीही निधी देण्यात येतो. असे असतानाही शाळांची दुरवस्था आहे. आधुनिक साहित्य दिल्यावरही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होत नसल्याचे केंद्र सरकारच्या निदर्शनास आले आहे.

एकप्रकारे निधीचा अपव्यय होत असल्याचे मत केंद्र सरकारचे आहे. त्यामुळे त्यांनी शाळांचे सामाजिक अंकेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. अंकेक्षणाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी, त्रास याची माहिती घेण्यात येणार आहे. यात आणखी काही सुधारणा हव्या का, याबाबत अहवालही केंद्राला देण्यात येईल. या मुद्द्यांवर तपासणी विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश, पुस्तके मिळालेत का, सर्व पुस्तके मिळाली की, काही कमी मिळाली, गणवेशचा दर्जा कसा आहे, शिक्षक कशाप्रकारे शिकवतात, आधुनिक साधनसाहित्य आहे का ? आदी मुद्द्यांची तपासणी होणार असल्याचे सांगण्यात येते. सामाजिक अंकेक्षणाचे काम पूर्ण झाल्यावर तालुकास्तरावर जनसुनावणीचे आयोजन करण्यात येणार आहे.

## ‘अजित पवारांसारखा दादा महाराष्ट्राला मिळणे अशक्य’

**| कर्जत | प्रतिनिधी |**

अजितदादांचे नेतृत्व, वक्तृत्व आणि कर्तृत्व महाराष्ट्रात अव्वल होते. दादांच्या जाण्याने महाराष्ट्रात पोकळी निर्माण झाली आहे, दादांच्या सारखा नेता दादा महाष्ट्राला पुन्हा मिळणे शक्य नाही, असे अजितदादांचे कर्तृत्व होते, अशा भावना व्यक्त करत राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे २८ रोजी बारामतीत विमान अपघातात निधन झाले. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राज्यभरात अजित पवार यांचे अस्थि कलश सर्वसामान्य जनतेच्या दर्शनासाठी फिरवले जात आहेत.

अजित पवार यांचा अस्थिकलश ३ जानेवारी रोजी कर्जत शहरातील राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या कार्यालयात दर्शनासाठी आणण्यात आल्या. या वेळी राष्ट्रवादी कॉँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर भ घारे, तसेच पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे पूजन

**| उरण | प्रतिनिधी |**

सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेला लोकनेता हरपला असल्याच्या भावना कॉँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र ठाकूर यांनी व्यक्त केल्या.



उरण राष्ट्रवादी कॉँग्रेस तर्फे, राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे(अजित पवार गट) उरण तालुका अध्यक्ष परिक्षित ठाकूर यांच्या वतीने उरण येथील आनंदी हॉटेलमध्ये अस्थिकलश पूजन व शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी महेंद्र ठाकूर हे आपल्या शोक भावना व्यक्त करताना बोलत होते.

यावेळी अस्थिकलशाचे पूजन करून, माणकेश्वर येथील समुद्रात अस्थींचे विसर्जन करण्यात आले. यापुढे बोलताना महेंद्र ठाकूर यांनी दादांच्या स्पष्ट वक्तेपणामुळे प्रशासनावर त्यांची पकड होती. दादांच्या जाण्याने कधीही न भरून निघणारी संपूर्ण महाराष्ट्राची हानी झाली आहे. असे सांगितले. तर राष्ट्रवादी कॉँग्रेसचे कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी राजकारणातील धुरंदर लोकाभिमुख नेतृत्व महाराष्ट्रने गम ावले आहे. दादा हे दादाच होते. दादांच्या विशेष योगदानामुळे ते नेहमीच सर्वांच्या स्मरणात राहतील, अशा शोक भावना संतोष ठाकूर यांनी व्यक्त केल्या. तेजस डाकी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना अजितदादा यांच्या आठवणीना उजाळा दिला. अजितदादा सारखे नेते पुन्हा होणार नाही दादा एक आदर्श राजकारणी होते असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित परीक्षित ठाकूर यांनीही अजितदादा यांच्या अनेक आठवणी सांगितल्या अजितदादा यांची काम करण्याची पद्धत आदर्श होती. कोणतेही काम लगेच करायचे. दादांचे कार्य सर्वांना कायम लक्षात राहिल. अजितदादा यांची उणीव नेहमी भासत राहिल. अजितदादा यांच्या जाण्याने देशाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करतो असे मत परीक्षित ठाकूर यांनी व्यक्त केले.

## रायगड विभागीय अविष्कार विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**| माणगाव | प्रतिनिधी |**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण यांच्या वतीने आयोजित ‘अविष्कार कल्पकतेतून कृतीकडे’ २०२५-२६ या उपक्रमांतर्गत रायगड विभागीय विज्ञान प्रदर्शन माध्यमिक विद्यालय रातवड येथे उत्साहात संपन्न झाले.



या विभागीय फेरीत रायगड जिल्ह्यातील पाच शाळांनी सहभाग नोंदवला. यामध्ये माध्यमिक विद्यालय रातवड, अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द, सरस्वती विद्यालय वडघर मुद्रे, जय जवान जय किसान विद्यालय वाघेरी तसेच गोळेगणी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय गोळेगणी या शाळांचा समावेश होता. इयत्ता ५ वी ते ९ वी मधील एकूण २२ प्रकल्प व ४० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला

विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरणीय विज्ञान, रोबोटिक्स यांसारख्या विषयांवरील नावीन्यपूर्ण व उपयुक्त प्रकल्प सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून कोलाड ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक पाटील व मेहतर यांनी काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक करत वैज्ञानिक दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले. सदर स्पर्धा माध्यमिक विद्यालय रातवडचे मुख्याध्यापक संतोष कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडले. विज्ञान विभाग शिक्षक राजेंद्र भगत व विभागातील सर्व विज्ञान शिक्षकांनी मेहनत घेऊन उत्तम असे नियोजन केले.

## फॉक शिव व्याख्यानाचे आयोजन

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

ज्ञानदा प्रोडक्शन प्रस्तुत फॉक शिव व्याख्यानाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे रविवार ८ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजता करण्यात आले आहे.

यावेळेस तीस कलाकारांसह स्वलिखित, स्वरचित, शिवगीतांचा सांगीतिक थाट पहावयास मिळणार आहे. संकल्पना दिग्दर्शन मिलिंद बाचल यांचे असून निर्माती माधुरी पाटील, निवेदक धीरेंद्र ठाकूर, संगीत- रोहित योगेश, गीतकार आकाश खंडागळे, योगेश पाटील, धीरेंद्र ठाकूर असणार आहेत.

## ज्येष्ठ नागरिकांची सहल उत्साही वातावरणात संपन्न

**| कोलाड | प्रतिनिधी |**

सालाबाद प्रमाणे कोलाड येथील स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने या ही वर्षी प्रेक्षणीय तिर्थक्षेत्र व देव दर्शन सहल नुकतीच आयोजित करण्यात आली.या सहलीमध्ये १०० सभासदांनी सहभाग घेतला होता. ही सहल उत्साही वातावरणात संपन्न झाली.

शनिवारी कोलाड ठिकाणाहून पाली येथील श्री बल्लालेश्वर,पळसदरी येथील श्री.स्वामी समर्थ महाराज मठ, अंबरनाथ-शिव मंदिर, शहाड-बिर्ला विठ्ठल मंदिर, टिटवाळा श्री गणेश मंदिर, महड येथील वरदविनायक अशा विविध ठिकाणी तीर्थक्षेत्राला भेट देऊन देवदर्शन घेण्यात आले.

या सहलीसाठी स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळाचे आजिव सभासदपांडुरंग जवके, बळीराजा शेतकरी सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पाशिलकर यांनी अल्पोपहार (नाश्ता-चहा) दिला. तर नंदकुमार पवार यांनी सर्व जेष्ठ नागरिकांना पिण्याचे पाणी देऊन सहकार्य केले.तसेच सर्वाच्या सहकार्याने महड या ठिकाणी जेवणाची सोय करण्यात आली.

## कारागृहात जागतिक कर्करोगदिनानिमित्त जनजागृती

**रायगड :** कर्करोगाबाबत जनजागृती वाढावी तसेच वेळेवर तपासणी व योग्य उपचारांचे महत्त्व अधोरेखित व्हावे, यासाठी दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोगदिन साजरा केला जातो. त्यानिमित्ताने अलिबाग जिल्हा कारागृहात बंद्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रबोधन सामाजिक सेवा संस्थेचे डॉ. मिलिंद पाटील व उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे डॉ. नितीन गांधी यांनी कर्करोगाची लक्षणे, कारणे व प्रतिबंधात्मक उपायांबाबत माहिती दिली. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. राजाराम हुलवान यांनी कर्करोगाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करण्याची गरज सांगितली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे उल्लेखनीय यश

**| महाड | प्रतिनिधी |**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ,परभणी येथे आयोजित करण्यात आलेल्या ङ्गआविष्कारफ राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला आहे. विविध विभागांत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी तीन पारितोषिके पटकावत शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या विभागात कुमारी दिक्षा संदीप पांढरकामे ही तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली आहे,तसेच वाणिज्य, व्यवस्थापन व विधी या विभागात कुमारी अनुष्का शेडगे हिने तृतीय क्रमांक मिळवला. प्राणीशास्त्र, कृषी व पशुसंवर्धन या विभागात श्रद्धा सावंत हिने चतुर्थ क्रमांक मिळवून विद्यापीठाचा गौरव वाढविला.या उल्लेखनीय यशाबद्दल माननीय कुलगुरू कर्नल प्रा.डॉ कारभारी काळे , कुलसचिव डॉ. अमित शेष तसेच अधिष्ठाता (शैक्षणिक) डॉ. संजय नलबलवार यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे मनः पूर्वक अभिनंदन केले आणि विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमांचे कौतुक करत त्यांनी भविष्यातही संशोधन व नवकल्पनांच्या माध्यमातून असेच अणिख यश मिळवावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत मिळवलेले हे यश डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरेच्या संशोधनात्मक आणि शैक्षणिक गुणवत्तेचे प्रतीक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. विद्यार्थ्याचा या यशामागे समन्वयक डॉ संजय खोब्रागडे,डॉ संगीता मेटकर, मार्गदर्शक डॉ. हर्षदीप जोशी, प्रो.अनिकेत जंगम आणि प्रो.तेजस महागावकर यांनी बहुमोलाचे मार्गदर्शन करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**निवडणुकीच्या कर्तव्यात भविष्याची चिंता | दूरवरच्या केंद्रांमुळेही वाताहत**

# सीटीईटी परीक्षेसाठी शिक्षकांची सत्वपरीक्षा

**| रायगड | प्रतिनिधी |**

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा देणाऱ्या रायगड जिल्ह्यातील शिक्षकांसाठी यंदाची परीक्षा म्हणजे केवळ ज्ञानाची नाही, तर एक मोठी सत्वपरीक्षा ठरली आहे.

एकीकडे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे कर्तव्य दुसरीकडे भविष्याची चिंता आणि शेकडो किलोमीटर लांब असलेली परीक्षा केंद्रे, यामुळे शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सीटीईटी परीक्षेसाठी रायगड जिल्ह्यातील एक हजार ४६५ शिक्षक बसले आहेत. विशेष म्हणजे शनिवारी (दि. ७) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकासाठी मतदान पार पडले.

निवडणूक आयोगाने या दिवशी सीटीईटी परीक्षेसाठी बसलेल्या शिक्षकांना निवडणुकीच्या कामातून सूट दिल्याचे घोषित केले होते. मात्र, रविवार (दि. ८) देखील सीटीईटी परीक्षा पार पडणार आहे. रविवारी परिक्षा देणाऱ्या शिक्षकांना शनिवारी निवडणूक ड्युटी लागली आहे. यातही परिक्षा केंद्रे लांब असल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे. निवडणूक ड्युटी आटोपून दुरवरच्या परीक्षा केंद्रावर जायचे कसे हा प्रश्न देखील या शिक्षकांना पडला असून आमच्यावर प्रचंड अन्याय झाला आहे, असा संताप त्यांनी व्यक्त केला आहे.

अनेक शिक्षकांना त्यांच्या निवासस्थानापासून दीडशे ते दोनशे किमी व त्याहूनही लांब अंतरावरील केंद्रे मिळाली आहेत. रविवारी पहिल्या सत्रासाठी सकाळी साडेसात वाजताचा उपस्थित राहण्याची वेळ दिली आहे. यामुळे परीक्षेच्या दिवशी सकाळी वेळेत पोहोचणे अनेक शिक्षकांसाठी अशक्य झाले आहे. अशीच परिस्थिती रायगड जिल्ह्यासह ठाणे, पालघर या जिल्ह्यातील शिक्षकांची देखील आहे. असे पालघर जिल्ह्यातील परीक्षार्थी शिक्षिकाने सांगितले.

शिक्षकांचा मोठा खटाटोपजिल्ह्यातील शिक्षकांना पनवेल, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, बदलापूर, अंबरनाथ, विरार अशी अनेक दूरवरची केंद्रे मिळाली आहेत. परिणामी इतक्या लांब कसे जायचे त्यात आदल्या दिवशी निवडणुकीचे कर्तव्य बजावल्यानंतर इतक्या दूरवर परीक्षा केंद्रावर कसे पोहोचायचे हाच यक्षप्रश्न या शिक्षकांना पडला आहे. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात राहणारे जसे पोलादपूर, महाड, श्रीवर्धन व म्हसळा येथील शिक्षक तणावाखाली आहेत. प्रवासासाठी वेगवेगळे मार्गप्रवासाचा थकवा टाळण्यासाठी आणि वेळेवर पोहोचण्यासाठी अनेक शिक्षकांनी परीक्षेच्या आदल्या दिवशीच केंद्राच्या शहरात जाऊन राहण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी त्यांना लॉज किंवा नातेवाईकांकडे आश्रय घ्यावा लागत आहे. जे शिक्षक आदल्या दिवशी जाऊ शकत नाहीत, त्यांना पहाटे ३-४ वाजल्यापासूनच घराबाहेर पडावे लागणार आहे. थंडी आणि अपुऱ्या सार्वजनिक वाहतुकीमुळे या शिक्षकांची प्रचंड वाताहत होणार आहे.

# नगरपरिषदेचे नियम पायदळी

## • राज्य राखीव पोलीसांचे वाहन समुद्र किनाऱ्यावर

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन समुद्र किनार्यावर पर्यटक नियमांची पायमल्ली करताना इतके दिवस दिसत आहेत. परंतु, किनाऱ्यावर राज्य राखीव पोलीसांचे वाहन दिसल्याने आता श्रीवर्धन नगरपरिषदेच्या नियमांची पायमल्ली पोलीसांकडून झाल्याने आता नगरपरिषद काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष राहिले आहे.

श्रीवर्धन तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकांचे मतदान शनिवारी (दि. ०७) फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत असून या कालावधीत तालुक्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी श्रीवर्धन पोलीसांकडून योग्य ती खबरदारी घेण्यात आली आहे. सुरक्षिततेचा भाग म्हणून राज्य राखीव पोलीस



बल गट तैनात करण्यात आले आहे. मात्र, सकाळी अकरा दरम्यान खेकडा स्पॉट किनाऱ्यावरील वाळूत राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ पुणे हे चारचाकी वाहन उपस्थितांच्या निदर्शनास आले, यावेळी या वाहनातून काही व्यक्ती समुद्र स्नानासाठी जातांना दिसल्या.

मठाचा गवंड व खेकडा स्पॉट किनार्यावरील रॅम्पवर नगरपरिषदे कडून, सर्व पर्यटकांसाठी वाळू, रेती मध्ये कोणीही वाहने घेऊन जाऊ नये. अन्यथा प्रतिबंधित क्षेत्रात वाहने घेऊन गेल्यास वाहन पोलीस विभागामार्फत जप्त करून कायदेशीर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असा सुचना फलक लावण्यात आला आहे. आता मात्र श्रीवर्धन पोलीस आणि नगरपरिषद वाहनावर कारवाई करणार की सक्त ताकीद देत वाहन सोडणार, या बाबतीत उपस्थित चर्चा करत होते.

# द्रोणागिरीत 'बस चोर' जेरबंद

## उरण पोलिसांची धडक कारवाई

**। उरण । प्रतिनिधी ।**

द्रोणागिरी सेक्टर ५० परिसर गुरुवारी मध्यरात्री अक्षरशः हादरून गेला, जेव्हा हातात घातक हत्यार आणि चोरीची बस घेऊन फिरणाऱ्या एका खतरनाक संशयिताचा थरारक पर्दाफाश झाला. स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे उरण पोलिसांनी तात्काळ धडक कारवाई करत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री साडेदहाच्या सुमारास संशयास्पद हालचाली करत बससह फिरणाऱ्या व्यक्तीकडे रहिवाशांचे लक्ष गेले.

परिस्थितीची गंभीरता ओळखत नागरिकांनी धाडसाने त्या संशयिताला घेराव घातला. हत्यार दाखवत पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला नागरिकांनी शिताफीने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. चोरी केलेल्या या मिनी बसवर श्री चिरनेर महागणपती असे नाव आहे तर या बसचा क्रमांक एम एच झिरो थ्री सीपी सेव्हन एट सेवन सेवन हा बस क्रमांक आहे. दरम्यान, नवी मुंबई परिसरात गेल्या दोन दिवसांत पोलिसांनी तब्बल २६ चोरीची वाहने हस्तगत केली असून, पकडलेला आरोपी हा मोठ्या वाहन चोरी रॅकेटचा भाग असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. सदर बस नेमकी कुठून चोरीला गेली, याचा सखोल तपास सुरू आहे.

नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला, अशी प्रतिक्रिया उरण पोलिसांकडून देण्यात आली. धाडसी नागरिक आणि तत्पर पोलिसांच्या संयुक्त कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ फेब्रुवारी

१) श्रीम.उषा वसंत खरे
रामनाथ- अलिबाग,
दि.८-२-१९५६

२)श्री.घनश्याम लक्ष्मण पेरेकर
ब्राम्हणआळी, ता.अलिबाग
दि.८-२-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

# रस्ता उखडलेल्यामुळे चालक त्रस्त



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील केंद्रस्थानी असलेल्या कोलाड-रोहा मार्गावरील कोलाड नाक्यावरील द. ग. तटकरे चौका समोर मुख्य रहदारीच्या ठिकाणी रस्ता उखडल्याने याचा त्रास वाहन चालकांसहित प्रवाशी वर्गाला सहन करावा लागत असुन गेली अनेक दिवसापासून सदरच्या रस्त्याचा उखडलेला भाग त्याच स्वरूपात असल्याने कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर या उखडलेला खड्डा भरला जाईल काय? अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

कोलाड-रोहा मार्गांवरील मुख्य रहदारीच्या ठिकाणी अनेक दिवसापासून रस्ता उखडला असून या मार्गावरून वाहन चालवितांना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.यामुळे या ठिकाणी वाहने धिम्या गतीने चालवावी लागत असल्याने येथे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. मुरुड ते कोलाड ताम्हाणी मार्गी पुणे या महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम अतिशय चांगल्या झाले असले तरी कोलाड-रोहा मार्गावरील द. ग. तटकरे चौकासमोरील २०० मिटरच्या सिमेंट काँक्रिटीकरण काम करण्यात आलेले नाही यामुळे या मार्गाच्या स्वागताला उखडलेला रस्ता अनेक वेळा भरला तरी याचा नाहक त्रास वाहन चालकांसहित प्रवाशी वर्गाला सहन करावा लागत आहे. यामुळे हा २०० मिटरचा रस्ता सिमेंट काँक्रेटने करण्यात यावा अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.

# विद्यार्थ्यांकडून पथनाट्य

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सहा आणि कर्जत पंचायत समितीच्या १२ गण मध्ये निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी सर्वांनी मतदान करावे यासाठी सर्व शालेय संस्था यांच्या कडून जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. त्या नेरळ गावातील विद्या विकास शाळांनी आपल्या शाळेत विविध उपक्रम राबविले. नेरळ गावातिल विद्या विकास शाळत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी मोठ्या प्रमाणात रांगोळ्या काढून जनजागृती करण्यात येत आहे. या शाळेतील नववीमधील विद्यार्थ्यांनी शैलजा निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पथनाट्य सादर केली. नेरळ गावात चौका चौकात फिरून मतदान वाढीसाठी मतदानाने जागरूक करण्याचे काम केले.

# माथेरानच्या रस्त्यांवर शुकशुकाट

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

जानेवारी महिन्यात सलग लागून आलेल्या सुट्ट्यांमुळे बहरलेल्या माथेरानमध्ये पर्यटकांची संख्या कमी झाली असून त्यामुळे येथील हात रिक्षा चालक, कुली, लहान व्यवसायिक तसेच हॉटेल व्यवसायावर याचा मोठा परिणाम झाल्याचे दिसत असून येणारे दोन-तीन महिने परीक्षेचा काळ असल्याने व्यावसायिकांची चिंता वाढली आहे. सध्या माथेरानच्या रस्त्यांवर शुकशुकाट असल्याने व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वीज व पाणी दर जास्त आहेत त्यामुळे ही बिले भरताना येथील व्यवसायिकांनी तारेवरची कसरत करावी लागत असते. आता येणाऱ्या काळामध्ये मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना सुरू होत असल्याने त्याही काळात माथेरानमध्ये पर्यटक



खूप कमी प्रमाणात असतात. हा मंदीचा काळ खूप मोठा असणार आहे.

हाजी मलंग येथे सुरू झालेल्या फेन्यकुलर रेल्वेमुळे ही माथेरानमध्ये पर्यटकांची संख्या घटल्याचे बोलले जात आहे, वनी, हाजी मलंग गड, व माथेरान हे तीन प्रकल्प एकाच वेळेस सुरू झाले होत. माथेरानच्या पर्यटन विकासावर अशाच प्रकारे अनेक वेळा बाहेरील लोकांच्या हस्तक्षेपामुळे माथेरान हे अनेक पर्यटन पूरक विकास कामांना मुकला आहे.

सर्वात मोठा रोपवे प्रकल्पही अधांतरी आहे हा प्रकल्प सुरू झाल्यास माथेरानचे पर्यटन ही वाढेल. माथेरानच्या अनेक समस्या सोडविण्यास शासन अपयशी ठरत आहे ज्यामध्ये मुख्यत्वे नेरळ माथेरान घाट रस्ता, नेरळ माथेरान मिनी ट्रेन संख्येत वाढ, पार्किंग व्यवस्था, माथेरान शहरांमध्ये सुरू असलेल्या रिक्षा वाढीबाबत सातत्याने विलंब अशासारख्या अनेक कारणांमुळेही माथेरानमधील पर्यटकांची संख्या कमी होऊ लागली आहे.

## श्रींचा प्रकट दिन सोहळा

**नवीन पनवेल :** श्री गजानन महाराज मंदिर ट्रस्ट गुरुपीठ नेरे यांच्या वतीने आठ फेब्रुवारी रोजी नेरे येथे श्रींचा प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्री मल्हारी मार्तंड देवता अभिषेक व श्री गजानन विजय ग्रंथ पहिला अध्याय वाचन, कीर्तन आणि पुष्पवृष्टी सोहळा होणार आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य ०९ ते १५ फेब्रुवारी २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## इतरांशी नाराजी टाळा

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहात आपण आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानकाळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल, मात्र सरकारी नियम व कायद्याचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना :** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल. **शुभदिनांक :** १०,११

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. प्रकृती जपा. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. **महिलांना :** माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. **शुभदिनांक :** १२,१३.

## संघर्षाचे प्रसंग टाळा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. **महिलांनाः** प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या. **शुभदिनांक :** १४,१५

## प्रलोभनात अडकू नका

**कर्क :** या सप्ताहात कर्कराशीधारकास आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. **महिलांनाः** बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **शुभदिनांक :** ९, १५

## तडजोडीची भूमिका घ्या

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहमान आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. या आठवड्यात आपली आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुनी वसूली होण्याची शक्यता. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कामकाजात घरुनच व्यस्त राहाल. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घेणे हितकारक ठरेल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. अनाठायी खर्च करण्याचे टाळावे. कठीण परिस्थितीत हुशारीने, चतुराईने पुष्कळ गोष्टी साध्य करता येतील. आपल्या नावाचा विचार मान सन्मानसाठी होणार आहे, विध्यार्थीवर्गाला चांगली संधी मिळेल. **महिलांनाः** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. नाही **शुभदिनांकः** १०,१३

## ध्येयासाठी प्रयत्न करा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक जागृत राहावे. विशेषतः कफ, उष्णतेचे विकार, खाण्यापिण्याचा हलगर्जी पणा करू नका जे जमते तेच करा. वाद-विवाद कटाक्षाने टाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रयत्नाने बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल. प्रकृतीच्या बाबत अधिक जागरूक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. कामाचा व्याप वाढणार आहे. मन स्थिर ठेवन्याचा प्रयत्न करा. आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिल्यास तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने आभ्यासा बाबत दुर्लक्ष करू नको. **महिलांनाः** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे. **शुभदिनांकः** ९, १०.

## अनावश्यक खर्च टाळा

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात इतरांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष द्या. आपल्या मनाला जे पटेल ते योग्य समजून वागणे योग्य ठरेल. आपल्या योजना स्वतःपुरत्या ठेवा. त्याची वाच्यता करू नका. आपले उद्दिष्ट पुढे ठेवून ते गाठण्याचा प्रयत्न करा. एक उद्दिष्ट ठेवून ते साधण्यासाठी प्रयत्नशील राहा. महिलांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामे करता येतील.. प्रकृतीची पथ्ये पाळा. रागावर नियंत्रण ठेवा. मुलांच्या विकासाकडे लक्ष द्या. मित्रमंडळींच्या संपर्कात राहा. पहिले तीन दिवस प्रथम सत्रात प्रकृतीबाबत जागरूक राहावे. दंतविकार, उष्णतेचे विकार याकडे लक्ष द्या. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांची मने दुखावणार नाही, याची काळजी घ्या. आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. मोठ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. विरोधकांना न दुखवता आपले कार्य साध्य करा. कायद्याचे पालन करा. नियम व कायदे यांचे पालन करा खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. **महिलांनाः** अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभदिनांक :** ११,१२

## प्रवासात सावधानता बाळगा

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या दैनंदिन जीवनात अनावश्यक खर्च करण्याचे टाळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. नोकरदारांना बराचसा दिलासा मिळेल. आपण आपल्या चातुर्याचा उपयोग केल्यास उत्तम. व्यापार-उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळेल व प्रगती करता येईल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल व हाती घेतलेल्या कामात परिश्रमाने यश संपादन करता येईल. प्रकृतीची पथ्ये पाळा. मौल्यवान वस्तू सांभाळा. प्रवासात सावधानता बाळगा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. या सप्ताहात शांतता व संयम बाळगणे आवश्यक. आपल्या कार्यकौशल्याचा कस लागेल. विरोधकांवर कडक नजर ठेवा. त्यांना संधी देऊ नका. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. कुणालाही नाराज करू नका. **महिलांनाः** आपल्या कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल व सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावरजंगमबाबतची कामे मार्गी लागतील. **शुभदिनांक :** १३,१४

## अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करा

**धनु :** राशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपल्या हुशारीने व कौशल्याने आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न कराल व त्यात यशस्वी व्हाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. काहींना विवाहाचे योगही संभवतात. नको त्या प्रलोभनात मात्र अडकू नका. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने सामोरे जा. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणालाही नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा सप्ताह सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल व वरिष्ठांची चांगले संबंध ठेवता येतील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. राजकीय क्षेत्रात आपले नाव होण्याची शक्यता राहील, मात्र आपल्या भावी योजनांबद्दल गुप्तता पाळणे हितकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्यास यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना :** कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. **शुभ दिनांकः** ११,१५

## स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा

**मकर :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपली कर्तव्ये काय आहेत याचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. सरकारी नियम व कायद्याचे कटाक्षाने पालन करा. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून कोणतेही काम केल्यास बऱ्याच प्रमाणात यशस्वी होऊ शकाल. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळवू शकाल. कोर्ट व शेतीविषयक कामांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. शुभकार्याचे संकेत मिळतील. सरकारी नियम कटाक्षाने पाळा. आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास आपणास चांगले समाधान मिळू शकेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. **महिलांना :** नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांकः** ९,१४

## नव्या संधी मिळतील

**कुंभ :** राशी एकूण ग्रहमान पाहता आपल्या पुष्कळशा समस्या या सप्ताहात सुटण्याची शक्यता आहे, मात्र त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. कामात अधिक लक्ष द्या. सरकारी नियमांचे पालन करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः छाती, पोट, डोळे यांच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. विरोधकांची धास्ती बाळगू नका. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपणास ग्रहांची अनुकूलता लाभणार असल्याने आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगला काळ राहील. निकाल आपल्या बाजूने लागेल. **महिलांना :** आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या. **शुभ दिनांकः** १३,१४

## कामाचे कौतुक होईल

**मीन :** हा साप्ताहात मीनराशीसाठी ग्रहमान पाहता विशेषतः नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आपला ताण उतरणार आहे, आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, खिशात पैसा खेळेल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **महिलांना :** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा, योगाचा अवलंब करा. **शुभ दिनांकः** १२,१३

# प्लास्टिक मुक्तीसाठी मनपाचा पुढाकार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेने प्लास्टिक पिशवी विक्रीवर प्रशासनाने ठोस पाऊले उचलण्याचा निर्णय घेतला असून नियमानुसार कमी जाडीच्या प्लास्टिक पिशवी विक्रेत्यांवर कडक निर्बंध घालण्याकरीता दुकानदारांना याआधी नोटीसा बजाविण्यात आल्या असून जनजागृतीच्या माध्यमातून सुद्धा पालिका प्रशासनाने नागरिकांना प्लास्टिक पिशवी वापरू नये असे आव्हान करण्यात आले होते. त्याच बरोबर पालिकेने धडक कारवाई सुरु ठेवल्याने पालिका क्षेत्रातून प्लास्टिक पिशव्या हद्दपार होण्याच्या मार्गावर असून शहराची प्लास्टिक मुक्तीकडे वाटचाल सुरु असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

काही प्लास्टिक पिशव्या अत्यंत पातळ असतात, ज्यामुळे त्यांचा पुन्हा वापर करताना अनेक अडचणी येतात. या प्लास्टिक पिशव्यांचा कचरा जगाची सर्वात मोठी समस्या बनलेली आहे. हा कचरा गाळ बनून आपल्या, सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईप्समध्ये, गटारांमध्ये, जमिनीत, नाल्यांमध्ये, नद्या व समुद्रात अडकून राहतो. असा कचरा साठल्यामुळे कित्येक कसदार जमिनी नापीक बनल्याची उदाहरणं आहेत. शिवाय हा कचरा हटवणं ही फार मोठी कठीण गोष्ट असते. खेरीज प्लास्टिक पिशव्यांचा हा कचरा इकडून नेऊन दुसरीकडे टाकला तरी तो नष्ट करणे शक्य नाही. त्यामुळे जगात या प्लास्टिक पिशव्यांच्या कचऱ्याचे ढिग वाढतच आहेत.

आज आपण खरेदी, वेष्टन, कचरा फेकणे अशा अनेक कारणांकरता प्लास्टिक पिशव्यांचा वापर करत असतो. याच प्लास्टिक पिशवीचं विघटन होण्यासाठी सुमारे एक हजार वर्ष लागतात. प्लास्टिक पिशव्या येण्याआधी माणूस वस्तू ठेवण्यासाठी प्राणीजन्य पदार्थांपासून बनवलेल्या पिशव्या किंवा आवरणांचा वापर करत होता. प्राणीहत्या थांबवण्यासाठी आणि सोयीसाठी प्लास्टिक पिशव्या वापरात आल्या. मंडई परिसरात अनेक छोट्या विक्रेत्यांकडून सर्रास प्लास्टिक पिशव्यांमधून मालाची विक्री केली जात होती. शहरात मोठ्या संख्येने किरकोळ विक्रेते फळविक्री करतात.

बहुतांश किरकोळ विक्रेते आणि फेरीवाले हे सर्रासपणे मान्यता नसलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या ग्राहकांस देत होते. त्यामुळे कचऱ्याचा, गटार तुंबण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला होता. पालिकेच्या पथकांकडून कारवाई करण्यात येत आहे. पालिका प्रशासनाचा ढिसाळपणा उघड.मनपा कर्मचारी पथकांची शहरात पाहणीपर्यावरणास घातक असलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांवर राज्य सरकारकडून बंदी असल्यामुळे पनवेल शहर महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकाकडून शहरभर कारवाई सुरू करण्यात आली आहे. काही फेरीवाले, किरकोळ विक्रेते पिशव्यांमधून त्यांच्या मालाची सर्रास विक्री करत असतात असे फेरीवाले, विक्रेते क्षेत्रीय कार्यालयांच्या पथकाच्या रडारवर आहेत.

## व्यापाऱ्यांवर कडक नजर

> स्वच्छता हि घराची लक्ष्मी हे ब्रीद वाक्य आपण आपल्या स्वतःच्या घरी कटाक्षाने पाळतो, तसेच आपले शहर हे सुद्धा आपले एक प्रकारे घरच असल्यामुळे नागरिकांनी प्लास्टिक पिशव्या कुठल्याही विक्रेत्याकडून न घेता पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करावी आणि अश्या पिशव्या कुठल्या विक्रेत्याकडे आढळून आल्यास महापालिकेच्या आरोग्य विभागा बरोबर संपर्क साधून स्वच्छ, सुंदर पनवेल शहरासाठी प्रशासनास सहकार्य करावे.
> –मंगेश चितळे,
> आयुक्त, पनवेल महानगरपालिका

# गिरीधर गोरे यांचे निधन

**पनवेल** : नवी मुंबई पोलीस दलातील एक अत्यंत अनुभवी, कर्तव्यदक्ष अभ्यासू अधिकारी म्हणून ओळखले जाणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पोलीस दलात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्व स्तरांतून शोक व्यक्त केले जात आहे. गोरे यांनी नवी मुंबई पोलीस दलात अनेक वर्षे सेवा बजावली होती. त्यांच्या कारकिर्दीचा प्रवास थक्क करणारा होता. त्यांनी नवी मुंबईत पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशा महत्त्वाच्या पदांवर काम करत शहराच्या सुरक्षेसाठी मोठे योगदान दिले. सध्या ते नवी मुंबई गुन्हे शाखेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते.

# रिक्षा चालकांविरुद्ध आरटीओची कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल, खारघर आणि मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरात रिक्षाचालकांच्या वाढत्या मनमानीविरोधात राज्य शासनाकडे तक्रारींचा पाऊस पडला होता. या तक्रारींची गंभीर दखल घेत पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाने आता कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. प्रवाशांची लूट आणि उद्धट वर्तणूक रोखण्यासाठी आरटीओने विशेष भरारी पथकांची नियुक्ती केली असून नियम मोडणाऱ्यावर थेट कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

स्थानक परिसरात रिक्षाचालकांकडून होणाऱ्या त्रासामुळे नागरिक हैराण झाले होते. मुख्यत्वे खालील मुद्द्यांवरून शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अनेक चालक अधिकृत गणवेश न घालताच रिक्षा चालवतात. मीटरप्रमाणे भाडे घेण्यास नकार देऊन अव्वाच्या सव्वा पैसे उकळले जातात. कारवाई टाळण्यासाठी केवळ दिखाव्यापुरती मीटरची वायर लावली जाते आणि नंतर ती काढून टाकली जाते. उद्धट वर्तणूक: विशेषतः महिला प्रवाशांशी सौजन्याने न वागता दादागिरी केली जाते. प्रवाशांच्या सुविधेसाठी पनवेल आरटीओने चार विशेष पथके तयार केली आहेत. ही पथके पनवेल, खारघर आणि मानसरोवर यांसारख्या गर्दीच्या स्थानकांवर तैनात असतील.

थांब्याव्यतिरिक्त पार्किंग नको: अधिकृत रिक्षा स्टँड सोडून इतरत्र कुठेही रिक्षा उभ्या दिसल्यास तातडीने कारवाई होईल. प्रवाशाने मीटरने जाण्याची मागणी केल्यास चालकाला नकार देता येणार नाही.

> प्रवाशांची अडवणूक करणाऱ्या रिक्षाचालकांना आता माफी नाही. आरटीओची पथके साध्या वेशातही लक्ष ठेवणार असून, नियमांचे उल्लंघन करणार्यांचे परमिट रद्द करण्यापर्यंतची कारवाई केली जाईल.
> – प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल



# गणेश हनुमान कला सर्कल ब्रास बॅण्डला रिदममध्ये द्वितीय क्रमांक

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

संत रोहिदास सामाजिक, शैक्षणिक क्रीडा संस्था टाइगर ग्रुप महाराष्ट्र राज्य आयोजित पालघर वाडा येथे पार पडलेल्या भव्य दिव्य ब्रास बँड स्पर्धेत कुंडेगाव कोळीवाडा येथील श्री गणेश हनुमान कला सर्कल ब्रास बँड यांना रिदम मध्ये द्वितीय क्रमांकाचे बेस्ट रिदम पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. ६ फेब्रुवारी रोजी वाडा पालघर येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान सांगोडे कल्याण येथे खुल्या ब्रास बँड स्पर्धेत देखील त्यांना तृतीय क्रमांक मिळाला होता. हे ब्रास बँड पथक नेहमी बिझी शेड्युल असते. कामाच्या ड्यूटी तसेच कॉलेज व कोळी बांधवांचा मच्छीचा धंदा सांभाळून खूप मेहनत करत अनेक ठिकाणच्या साखरपुडा, हळदी, समारंभ, लग्न वरात, रिसेप्शन, कुलदैवत, देवींचे उत्सव सर्व ठिकाणी ऑर्डर घेत असतात. हमखास पब्लिक नाचणारच ही खासियत श्री गणेश हनुमान कला सर्कल ब्रास बँडची आहे. स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल या ब्रास बँडच्या कलाकारांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# वणव्यांमुळे वन्यप्राण्यांचे मोठे नुकसान

**। महाड । प्रतिनिधी ।**



उन्हाळ्याची चाहूल लागताच साधारण फेब्रुवारी महिना सुरू झाला की, महाड खाडीपट्ट्यातील डोंगरांना वनवे लागण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. मात्र यावेळी फेब्रुवारी महिना सुरु होण्यापूर्वीच जानेवारीमध्येच वणव्यांनी उग्ररुप घेतले आहे. दररोज लावण्यात येणाऱ्या वणव्यांमध्ये खाडीपट्ट्यातील वनसंपदा व वन्यप्राण्यांचे देखील मोठे नुकसान होत आहे. काही ठिकाणी अज्ञानातून तर काही ठिकाणी मुद्दाम वणवे लावले जात असल्याचे नागरिकांकडून सांगितले जाते. वणवे रोखण्यासाठी वनविभागाने वेळीच कडक पावले उचलणे गरजेचे असल्याचे काही सुज्ञ नागरिकांनी सांगितले. डोंगरांवर वणव्यांचे प्रमाण जास्त आहे. येथील लागलेल्या वणव्यामुळे सारे डोंगर उघडे बोडके झाले आहेत. त्यामुळे येथील डोंगररांगा काळवंडलेल्या पाहायला मिळत आहेत. या भागात जाणून-बुजून वणवे लावले जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार केल्या जात आहेत. वारंवार लागणाऱ्या या वणव्यांमुळे अमूल्य वनसंपदा त्याचबरोबर औषधी वनस्पतींची देखील अतोनात नुकसान होत आहे. मोठे वृक्ष ही वणव्यांमुळे होरपळून जात आहेत, त्याचबरोबर राष्ट्रीय महामार्गाच्या लगतच्या डोंगररांगा वणव्यामुळे जळून खाक होत आहेत.

सामाजिक संस्थांकडून वारंवार होत असलेल्या वृक्ष लागवडीचे वणव्यामुळे नुकसान होत आहे. वृक्ष लागवड अभियानातील चांगली वाढलेली झाडे वणव्याच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. वणव्यांमुळे वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येत आहे. अनेक छोटे-मोठे वन्यजीव आगीच्या तावडीत सापडून होरपळले जात असल्याने जीवसृष्टीच्या चक्रातून गंभीर परिणाम होत आहेत. तर त्यामुळे कित्येक वन्यजीव गावाकडे धाव घेत असल्याचे अनेकवेळा निदर्शनास आले आहे. दुपारच्या रखरखत्या उन्हामध्ये वणव्याच्या आगीमूळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना गरमीच्या कडक ज्वालांशी सामना करावा लागत आहे.

सातत्याने लागणाऱ्या या वणव्यांवर वन विभागाने कारवाई करणे गरजेचे आहे. यासाठी गावागावांतून जनजागृती करायला हवी. वेगवेगळ्या समित्या गठन करून त्या माध्यमातून वणवे रोखण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, तरच आगीच्या भक्ष्यस्थानी पडणारी वनसंपदा वाचण्यास मदत होईल. अन्यथा, पर्यावरणाचे नुकसान असेच होत राहील असे सुज्ञ नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल मे.कृष्णा रिॲलीटी तर्फे प्रोप्रायटर सौ.स्नेहलता चित्तरंजन गंन्तायत यांनी खाली नमुद केलेली बिनशेती मिळकत जमीन मिळकतीचे मालक सौ.संगिता जयबजरंग जाधव, राहणार श्लोक रेसीडन्सी, फ्लॅट नं १३, ४ था मजला, बी विंग, शिवाजी नगर, दहिवली तर्फे नीड, कर्जत, ता. कर्जत, रायगड, पिन कोड ४१०२०१ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| मौजे दहिवली तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड | १७२/२ | ३.५५.२५ | ३५.५२ |

**सदर मिळकतीच्या चर्तु:सिमा**
पुर्वेस- प्लॉट नं.३ ची मिळकत
पश्चिमेस- प्लॉट नं.१ ची मिळकत
उत्तरेस- प्लॉट नं. १३ व ११ ची मिळकत
दक्षिणेस- ९ मिटर रुंदीचा रस्ता

वरील वर्णनाच्या बिनशेती जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल व सदर मिळकतीवर कोणीही गुंतवणूक केले असेल अथवा सदर मिळकतीवर कोणाचेही भार अथवा बोजा असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१(एकवीस) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. ०८.०२.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा.पाल टॉवर, भिसेगाव,
ता.कर्जत, जि.रायगड.
मो.९३०७८८५७११



## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- बोअरवेल, विहीरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- शुभमूर्हूत विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवरांची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण– बामणसुरे, चोंढी, पगार– १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या कामासाठी सिस्टर व मावशी यांची आवश्यकता आहे. संपर्क : ९८२२४०९८४९/९८५०३४८५०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# इन्नोवेशन सिटी योजनेला वेग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

देशाच्या पायाभूत सुविधा आणि तांत्रिक विकासाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल उचलले जात आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात एक अत्याधुनिक आणि जागतिक दर्जाची इन्नोवेशन सिटी विकसित करण्याच्या योजनेला वेग आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात देशातील अग्रगण्य औद्योगिक समूह टाटा ग्रुप सुमारे ११ अब्ज डॉलर (अंदाजे ९० हजार कोटी रुपये) गुंतवणूक करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

भारताच्या शहरी आणि औद्योगिक विकासामध्ये हा प्रकल्प एक नवा अध्याय ठरणार आहे. ही इन्नोवेशन सिटी केवळ एक व्यावसायिक किंवा आयटी झोन नसेल, तर ते एक संपूर्ण अर्बन-टेक इकोसिस्टम असेल. जिथे संशोधन, नवनिर्मिती, उद्योग आणि आधुनिक जीवनशैली यांचा संगम पाहायला मिळेल. तज्ज्ञांच्या मते, हा प्रकल्प केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण भारताची आर्थिक आणि औद्योगिक प्रतिमा बदलण्याची क्षमता ठेवतो.

सिंगापूर, दुबई, लंडन आणि मस्टरडॅम सारख्या शहरांच्या धर्तीवर विमानतळाभोवती हा विकास केला जाणार आहे. कनेक्टिव्हिटी: आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यामुळे जागतिक कंपन्या, गुंतवणूकदार आणि तांत्रिक तज्ज्ञांना थेट आणि जलद दळणवळणाची सुविधा मिळेल. रोजगार निर्मिती: तंत्रज्ञान आणि स्टार्टअप्सना चालना मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

आर्थिक इंजिन: विमानतळाला केवळ वाहतुकीचे केंद्र न मानता, त्याला आर्थिक उपक्रमांचे मुख्य केंद्र बनवण्याची ही योजना आहे. टाटा समूहाकडून होणारी ही संभाव्य मोठी गुंतवणूक भारताच्या भविष्यातील तंत्रज्ञान क्षेत्रातील विश्वासाचे प्रतीक मानली जात आहे. यामुळे नवी मुंबई परिसर जागतिक गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र म्हणून उदयास येईल.

# लिटिल आयडल किड्सचे स्नेहसंमेलन

**पनवेल** : लिटिल आयडल किड्स स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन पनवेल शहरातील आद्यक्रांतीवर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात साजरे झाले. यावेळी मिलिंद खारपाटील,विश्वास भगत, अतुल तांबे, दीपक कदम, रंजिता पाटील, भगत, हिरामण कोकणे, राहुल गुप्ता, जयप्रकाश गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. छोट्या छोट्या बच्चे कंपनीने अतिशय सुरेख नृत्य करुन पालक आणि प्रेक्षकांना खुर्चीस खिळून ठेवले होते. प्रत्येक गाण्यानंतर टाळ्या, शिट्या आणि वन्स मोअर असा जोरदार प्रतिसाद मिळत होता.

# व्यवसायात फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

व्यवसायात गुंतवणूक करून नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि पैसे परत न देता फसवणूक केल्याप्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला. मेहवाज हसवारे हे खारघर, सेक्टर ८ येथे राहत असून त्यांना ओळखीचे राहिल इस्माईल सोंडे (रा. नांदगाव मुरुड) आणि त्याचे मेव्हणे दिवाण मोटर्सचे मालक सलमान दिवाण आणि सुफियान अनवर दिवाण (रा. पटेल मोहल्ला पनवेल) यांनी दिवाण मोटर्सच्या व्यवसायात गुंतवणूक करून त्यावर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि ५६ लाख रुपये रोख घेतले. त्यानंतर सलमान आणि सुफियान यांनी त्यांचे राहते घर पटेल मोहल्ला पनवेलच्या बाजूचे घर खरेदी करून गुंतवणूक करण्यास सांगितली आणि त्यावर नफा मिळवून देतो व दिलेल्या रकमेच्या मोबदल्यात बांधत असलेल्या १० माळ्याच्या टॉवरमध्ये पाच फ्लॅट देतो असे सांगून एक कोटी तीन लाख तीस हजार रुपये घेतले. असे एकूण मेहवाज यांच्याकडून एक कोटी ५९ लाख ३० हजार रुपये घेऊन सदरची रक्कम परत मागितली असता रक्कम न देता अंडरवर्ल्ड मध्ये ओळख असून पैसे परत मागितले तर मारून टाकू अशी दमदाटी केली.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे नाडसूर, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.किरण बाळाराम मिनमिने | ३७४ | ०-४०-०० | ०-१३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क हीतसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०८/०२/२०२६

**खरेदीदारांतर्फे,**
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं ७ पाली,
ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# डॉ.विजय व्यवहारे यांची नियुक्ती

**पनवेल** : असोसिएशन ऑफ क्लिनिकल् परफ्यूशनिस्ट महाराष्ट्र संस्थेची नवीन कार्यकारिणी जाहीर झाली असून अध्यक्षपदी डॉ. विजय व्यवहारे यांची सन २०२६ या सालाकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यकारिणीमध्ये अभय चव्हाण, किरण आंब्रे, राजू दौड, कुलकर्णी, प्रशांत धुमाळ, वैशाली मेटे, सुरेश काळे, शशी काळे, डॉ. विश्वास पॉल, प्रतापसिंग चौहान, विनयचंद्रा शिंपी, डॉ. विजया लांजे, लहु सुपेकर, अमित पाटील, प्राची सोनावणे, विराज शिगवाण, अक्षय रेवडेकर, पंकज पाटील, अभिषेक शेट्ये व विवेक पॉल यांची निवड करण्यात आली आहे.

# रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शेवटच्या टोकाला असणारी रायगड जिल्हा परिषद शाळा झुगरेवाडी ही विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा या उद्देशाने शासनाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा या उद्देशाने आणि या उपक्रमांचा एक भाग म्हणून झुगरेवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून



मतदानाचा हक्क बजावण्याचा संदेश दिला असून, संपूर्ण गावात जनजागृती केली आहे, त्याचा निश्चित फायदा मतदानाचा टक्का वाढण्यात होईल व मतदार राजा सजग व जागरूक राहून विचारपूर्वक मतदान करील असा विश्वास समीर पारधी, रोहिणा वाघ, सोनल हुमणे या विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. राजश्री पाटील, जनार्धन, निरगुडा, केंद्रप्रमुख, लक्ष्मण पादिर यांनी विशेष सहकार्य केले.

> शाळेत नेहमी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात शासनाच्या स्वीप कार्यक्रम अंतर्गत मतदान जनजागृती साठी विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती चा अनमोल संदेश सर्व पालक व ग्रामस्थांना दिला आहे यावेळी कार्यालयाच्या वतीने झोनल ऑफिसर यांनी भेट देऊन कौतुक केले.
> –रवी काजळे मुख्याध्यापक झुगरे वाडी

# शेकडो बोटी मासळीविना परतल्या

**। उरण । प्रतिनिधी ।**



वाढते वादळी वारे व हवामानातील बदलांमुळे मासेमारी बोटी रिकाम्या परंतू लागल्याने मासळीची आवक घटली आहे. यामुळे मासळीच्या घाऊक आणि किरकोळ दरात २५ ते ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. सध्या अनेक कारणांनी भाज्यांचे दर वाढले असताना मासळीच्या दरानेही उसळी घेतल्याने सर्वसामान्यांचे मासिक बजेट कोलमडू लागले आहे.

तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. करंजामध्ये नव्याने सुरू झालेल्या करंजा-द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करू लागले आहेत. यामध्ये सायंकाळच्या सुमारास भरणाऱ्या बाजारामध्ये छोट्या करंदीपासून कोलंबी, पापलेट, सुरमई, रावस, कलेट, हलवा, कुपा, बोंबील असे सुमारे ३० ते ४० प्रकारचे अनेक मासे विक्रीसाठी दिसून येत आहेत.

## खवय्यांचे बजेट कोलमडले

करंजा बाजारात बला, वाम, पाला, माखली, मांदेली, ढोमी, पाकट, शिंगाला, चिंबोरी असे मासेदेखील विक्रीसाठी असल्याचे दिसून आले आहे. तर या मासळी बाजारात सुरमई, कोलंबी, कुपा, पापलेट, कलेट यांना अधिक मागणी आहे. यात पापलेट, सुरमई, तिष माशांचे प्रकार कमी प्रमाणात मिळत आहे. सागरी किनाऱ्यावरील हजारो बोटी बंदरात नांगरून ठेवण्यात आल्या आहेत. सततच्या बदलत्या हवामानामुळे मासळीची आवक घटली आहे. परिणामी भाव चांगलेच कडाडले आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ६५ | एकूण क्षेत्र ०-५८-०० हे.आर. | ८.१९ |
| ६३ | एकूण क्षेत्र ०-०३-०० हे.आर. | ०.१४ |
| १३१/२२ | एकूण क्षेत्र ०-१८-७० हे.आर. | १.०० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०८/०२/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : दिवसाच्या सुरूवातीस महत्त्वाचा दिलासा मिळेल. मुलांची प्रगती होईल. प्रकृतीच्या तक्रारी दूर होतील.
- **वृषभ** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकारा. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. आर्थिक ताण कमी होईल.
- **मिथुन** : कोणतेही निर्णय घाईने घेऊ नका. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. आनंदी, समाधानी रहाल.
- **कर्क** : घर दुरूस्तीच्या कामांना गती येईल. प्रवास शक्यतो टाळायला हवा. व्यवसायात बरी स्थिती राहील.
- **सिंह** : आजच्या दिवसात महत्त्वाचे लाभ होतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. रखडलेली कामं होतील.
- **कन्या** : कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. आर्थिक व्यवहारात जाणकारांचा सल्ला घ्यावा. विचारानं रहावं.
- **तूळ** : रखडलेली कामं मार्गी लागतील. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. विवाहाच्या प्रयत्नात यश मिळेल.
- **वृश्चिक** : कार्यक्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील. प्रियजनांचा सहवास लाभेल. आर्थिक बाबतीत ताण राहील.
- **धनु** : सर्वच बाबतीत अनुकूलता राहणार आहे. स्वमताग्रह टाळायला हवा. आप्तेष्टांच्या भेटीने आनंद होईल.
- **मकर** : महत्त्वाचे करार पार पडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **कुंभ** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. प्रवासात मौल्यवान वस्तुची काळजी घ्यावी. येणी वसूल होतील.
- **मीन** : नव्या योजना मार्गी लागतील. स्थावर प्रश्नात लाभ संभवतो. पित्ताच्या विकाराबाबत काळजी घ्या.

सौंदर्यसाधना

## उपयुक्त 'इसेंशियल ऑईल्स'

* लिंबाच्या सालींचा वापर करूनही तेल तयार करता येईल. यासाठी चार ते पाच लिंबांचं साल काढून घ्या. वाटीत खोबरेल, बदाम किंवा आवळा तेल घेऊन त्यात लिंबाची सालं बुडवून ठेवा. आता एका भांड्यात थोडं पाणी ठेऊन त्यात ही वाटी ठेवा. आता हे भांडं गॅसवर मंद आचेवर ठेवा. अधूनमधून वाटीतल्या लिंबाची सालं हलवा. लिंबाचा सुगंध पसरल्यावर गॅस बंद करा. आता हे तेल गाळून प्लास्टिक किंवा काचेच्या बाटलीत ठेवा. नियमित वापरा.

* पुदिन्याच्या पानांपासूनही इसेंशियल ऑईल बनवता येईल. यासाठी पुदिन्याची पानं घ्या. खोबरेल, बदाम, आवळा किंवा तुमच्या पसंतीच्या कोणत्याही तेलात बुडवून ठेवा. हे मिश्रण काचेच्या बरणीत भरून दोन ते तीन दिवस उन्हात ठेवा. तेल गाळून बाटलीत भरून ठेवा. खोबरेल तेल गोठत असल्याने थंडीत शक्यतो त्याचा वापर करू नका.

## ८ फेब्रुवारी

दिनविशेष

- **२०१३** : युरोपीय संघाने गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर दहा वर्षांपासून टाकलेला बहिष्कार मागे घेतला.
- **२०१४** : जनलोकपाल विधेयकासाठी कोणत्याही थराला जाण्याची दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची धमकी.
- **२०१८** : जन्मठेपेची शिक्षा कमी करुन घेण्यासाठी मंत्रालयात आलेल्या हर्षल रावते नामक तरुणाने मंत्रालयातील पाचव्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली.

स्मार्ट टिप्स

## ब्राउजरचा वेग वाढवायचा तर...

काही एक्सटेंशन्स वेब ब्राउजरचा वेग वाढवू शकतात. गुगल क्रोम, मोझिला फायरफॉक्स किंवा इंटरनेट एक्सप्लोरर यापैकी कोणत्याही ब्राउजरसाठी ही एक्सटेंशन्स उपयुक्त ठरतात.

* वेब ब्राउजरच्या स्क्रोलिंगचा वेग वाढवण्यासाठी 'डस्टमॅन' हे एक्सटेंशन वापरलं जातं. 'क्रोम' आणि 'फायरफॉक्स'मध्ये ते वापरता येईल. * माउसचं डिझाइन आणि आकार कस्टमाइज करण्यासाठी 'सीआरएक्स माउस जेस्चर्स' हे एक्सटेंशन वापरायला हवं. यामुळे माउसचं जेस्चरही बदलता येईल. * 'सुपर हिस्टरी अँड कॅश क्लिनर' एक्सटेंशनमुळे ब्राउजरची हिस्ट्री, कॅश आणि टेम्पररी फाईल्स क्लिन करता येतात. * 'इम्पल्स ब्लॉकर' हे एक्सटेंशन डाउनलोड करून नको असलेल्या साईट्स ब्लॉक करता येतील. * वेब ब्राउजिंग डाटा सेव्ह करण्यासाठी 'एव्हरनोट क्लिपर' डाउनलोड करा. डेटा ऑर्गनाइज करण्यासोबतच आधीचे सर्च शोधण्याच्या कामी हे एक्सटेंशन तुम्हाला मदत करेल. * इंटरनेटची बँडविड्थ वाढवण्यासाठी 'बँडविड्थ हिरो' हे एक्सटेंशन वापरा. यामुळे इंटरनेटचा वेग वाढतो.

### पंचांग

**रविवार, ८ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ कृ. ७, चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : स्वाती, योग : गंड,
सूर्योदय ७.१२, सूर्यास्त ६.३३

### फॉरवर्डस

**बेशक़ हमारीं ज़ुबाँ कड़वी मग़र**
**दिल साफ ऱखते हैं...**

**क़ौन कहाँ कब बदल ग़या सब**
**हिसाब ऱखतें हैं...!**

आरोग्यमंत्र

## कॉफी घ्या, निरोगी रहा

चहा अथवा कॉफीचं सेवन ही अनेकांसाठी नित्याची बाब असते. याशिवाय त्यांच्या दिवसाची सुरूवातही होत नाही. पण तुम्ही कॉफीप्रेमी असाल तर ग्रीन कॉफीची चव घेऊन बघा. ग्रीन कॉफीच्या सेवनाचे अनेक लाभ आहेत. यामुळे ओव्हरइटिंगपासून स्वतःचा बचाव करणे शक्य होत असल्याची माहिती आपण घेतली. याबरोबरच ग्रीन कॉफीचे सेवन हा रक्तदाबावर उत्तम उपाय असल्याचंही तज्ज्ञांचं मत आहे. एका संशोधनानुसार, ग्रीन कॉफीमुळे रक्तदाब नियंत्रित राहायला मदत होते. म्हणूनच रक्तदाबाच्या रुग्णांसाठी ग्रीन कॉफी वरदान मानली जाते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीमुळे हार्ट अॅटॅक आणि क्रॉनिक किडणी फेल्युअरचा धोका कमी होण्यासही मदत होऊ शकते.



ग्रीन कॉफीचा उपयोग एनर्जी बुस्टर म्हणूनही केला जातो. यात व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स मुबलक प्रमाणात असतात. ग्रीन कॉफीत कॅफिनही असतं. त्यामुळेच डोकेदुखीपासून बचाव होण्यासाठी ग्रीन कॉफीचा उपयोग होतो. ग्रीन कॉफीत असणाऱ्या कॅल्शिअममुळे हाडं मजबूत होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे स्ट्रेस कमी करण्यासाठीदेखील याचा उत्तम उपयोग होतो. अर्थात असं असलं तरी रिकाम्या पोटी ग्रीन कॉफी न पिण्याचा सल्ला दिला जातो. नाश्ता झाल्यानंतर किंवा जेवण झाल्यानंतर ग्रीन कॉफी घेतली, तर पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि इतर कारणांसाठीदेखील त्याचा उपयोग होतो. भरल्या पोटी ही कॉफी घेतल्याने अॅसिडिटी होण्याचा धोका कमी होतो.

### वेगळ्या वाटा

निवडणुकांच्या काळात विश्लेषकांना बरीच मागणी असते. कोणाची सत्ता येणार, कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार याबाबत विविध संस्था, वृत्तवाहिन्या अंदाज वर्तवतात. अर्थात या मागे तज्ज्ञांची बरीच मेहनत असते. या तज्ज्ञांना विश्लेषक किंवा 'सेफोलॉजिस्ट' म्हणतात. या क्षेत्रात करीअर करता येईल.

निवडणूक विश्लेषक म्हणून काम करताना आकडेवारी आणि लोकांचा दृष्टिकोन पारखावा लागतो. तज्ज्ञांशी बोलावं लागतं. मागील निवडणुकांचा अभ्यास करावा लागतो. सर्वसामान्यांशी बोलून मतप्रवाह जाणून घ्यावा लागतो. यानंतरच संभवित निकाल दिले जातात. बरेचदा हे अंदाज खरे ठरतात. त्यामुळे राजकीय पक्षांकडूनच निवडणूक विश्लेषकांना बरीच मागणी असते. (क्रमशः)

फॅशन पॅशन

## टाळा या चुका

दोस्तांनो, सध्याच्या फॅशनच्या युगात सतत नवनवीन काही घडत असतं. ते लक्षात घेऊन तुम्हीही नवनव्या फॅशन्सचा अवलंब करत असाल. परंतु फॅशन्सचा अवलंब करताना काही चुका होण्याची शक्यता असते. असं झाल्यास स्मार्ट लूक प्राप्त करता येत नाही. त्यामुळे अशा कोणत्या चुका होऊ शकतात आणि त्यांचे काय परिणाम दिसून येतात, हे जाणून घ्यायला हवं.



* योग्य फिटिंग नसलेला शर्ट घालणं ही मुलांची मोठी चूक ठरते. मोठ्या आकाराच्या शर्टमध्ये तुम्ही शोभून दिसत नाही. असे शर्ट घातल्यानंतर शरीर फुगल्यासारखं वाटतं. असे फुगीर शर्ट अजिबात घालू नका.

* शर्टच्या आतमधला बनियन किंवा टी शर्ट दिसता कामा नये. शर्टची काही बटणं उघडी ठेवायची असतील तर व्ही नेकवाला शर्ट घाला. शर्टच्या आतमधला टी शर्ट दिसणं चांगलं नसतं. ही फॅशनबाबतीतली मोठी चूक ठरू शकते.

* सेलमध्ये किंवा इतर काही कारणांमुळे पुढच्या वर्षी वापरण्यासाठीचे कपडे आधीच घेतले जातात. हीसुध्दा चूक आहे. कारण काही दिवसांनी फॅशन बदलेली असते. त्यातच कपडे घालतेवेळी तुम्ही घेतलेला साईज बसेलंच याची शाश्वती नसते. मोठे खिसे असणाऱ्या पँट घालू नका. या जीन्स पुरुषांसाठी तयार केल्या नाहीत त्यांच्या वॉर्डरॉबमध्ये समावेशाची गरज नाही.

खेचाखेची

## ठळक घडामोडी

ग्रामपंचायतीच्या वतीने एक सत्कार त्या लोकांचा पण करा...
.
.
.
.
.
जे गावात कट्ट्यावर बसून गावातील ठळक घडामोडी पुराव्या सहित सांगतात!

### वेगळं काही

माणसाच्या डोक्यावर सर्वसाधारणपणे एक ते दीड लाख केस असतात. दिवसाला सरासरी १०० ते १५० केस गळतात. 'बोन मॅरो'नंतर शरीरातला सर्वात वेगाने वाढणारा टिश्यू म्हणजे केस. 'बोन मॅरो' हे हाडांच्या आत असलेले मऊ आणि फुगीर टिश्यू. केसाचा निरोगी धागा ओला असताना ३० टक्के अधिक प्रमाणात ताणला जातो. मुळापासून उखडला जाण्याच्या क्षणापासूनच त्या जागी दुसऱ्या केसाच्या वाढीला सुरूवात होते. वेगवेगळ्या वेळी डोक्यावरच्या ९० टक्के केसांची वाढ होत असते तर उर्वरित दहा टक्के केस विश्रांती घेत असतात. एका केसाचं आयुष्य साधारणपणे पाच वर्षांचं असतं. केस 'केराटिन' नामक घटकापासून बनलेले असतात.

व्हा टेक सॅव्ही

## घ्या अॅप्सचा आधार

आजकाल स्मार्टफोनचा वापर बराच वाढला आहे. विशेषतः स्मार्टफोनमधील अॅप्स काही बाबतीत कामी येत आहेत. कारकिर्दीच्या आणि घरच्या अशा दुहेरी जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या महिलांसाठी काही अॅप्सचा चांगला आधार मिळू शकतो. त्यादृष्टीने सरकारी सेवा घरबसल्या उपलब्ध करून देणाऱ्या अॅप्सविषयी जाणून घेऊ,,,



* लांब पल्ल्याच्या गाड्यांचं तिकिट आरक्षित करण्यासाठी आयआरसीटीसीची वेबसाईट आहे. परंतु युटीएस अॅप डाउनलोड करून लोकल गाड्यांचं तिकिटही सहज आरक्षित करता येतं. यामुळे लोकलच्या तिकीटासाठी रांगेत उभं राहण्याचा त्रास वाचतो.

* पासपोर्टविषयक सर्व माहिती एम-पासपोर्ट नावाच्या अॅपवर उपलब्ध आहे.

* मुलांसाठी स्कॉलरशीपच्या दृष्टीने नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलला भेट द्या.

* स्मार्टफोनच्या सुरक्षेसाठी एम-कवच हे सरकारी अॅप डाउनलोड करा. मालवेअर, व्हायरस तसंच स्पॅम कॉल्सना दूर ठेवण्याचा हा सर्वात चांगला उपाय आहे.

* विविध सरकारी कामं उमंग अॅपमुळे सोपी झाली आहेत. इथे सरकारी योजनांची माहिती उपलब्ध आहे.

## सुडोकू ६४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ८ | | | १ | | | २ | |
| ६ | | | ३ | | ५ | | | १ |
| | | ७ | | | | ४ | | |
| | २ | | १ | | ९ | | ५ | |
| ७ | | | | | | | | ६ |
| | ९ | | ६ | | ३ | | ४ | |
| | | ५ | | | | ३ | | |
| ९ | | | २ | | १ | | | ८ |
| | ३ | | | ६ | | | ७ | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | २ | ७ | १ | ५ | ४ | ३ | ९ | ६ |
| ९ | ६ | ५ | ३ | २ | ७ | १ | ४ | ८ |
| ३ | ४ | १ | ६ | ८ | ९ | ७ | ५ | २ |
| ५ | ९ | ३ | ४ | ६ | ८ | २ | ७ | १ |
| ४ | ७ | २ | ५ | १ | ३ | ६ | ८ | ९ |
| ६ | १ | ८ | ९ | ७ | २ | ४ | ३ | ५ |
| ७ | ८ | ६ | २ | ३ | ५ | ९ | १ | ४ |
| १ | ५ | ४ | ७ | ९ | ६ | ८ | २ | ३ |
| २ | ३ | ९ | ८ | ४ | १ | ५ | ६ | ७ |

## शब्दकोडे क्रमांक ६४

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ■ | ६ | ७ | | ८ | ९ |
| १० | | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | १४ | | | ■ | १५ | |
| ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | | ■ | १९ | | ■ | |
| २० | ■ | २१ | | ■ | २२ | | ■ | २३ | | | ■ | २४ | |
| २५ | | | ■ | २६ | ■ | २७ | | | ■ | ■ | २८ | | ■ |
| | ■ | २९ | | | ३० | | ■ | ३१ | ३२ | | | | ३३ |
| ३४ | ३५ | | ■ | ३६ | | ■ | ३७ | | | ■ | | ■ | |
| ■ | ३८ | | ३९ | | ■ | ४० | | ■ | ४१ | ४२ | ■ | ४३ | ■ |
| ४४ | | ■ | | ■ | ४५ | | | ४६ | ■ | ४७ | ४८ | | ४९ |
| ■ | ५० | ५१ | | ५२ | | | ■ | ५३ | | ■ | | ■ | |
| ५४ | ■ | | ■ | | ■ | ५५ | ५६ | | ■ | ५७ | | ५८ | |
| ५९ | | | | ■ | ६० | ■ | ६१ | | ६२ | | ■ | ६३ | |
| | ■ | | ■ | ६४ | | ६५ | ■ | ६६ | | ■ | ६७ | | ■ |
| ६८ | | | | | ■ | ६९ | | | ■ | ७० | | | |

**आडवे शब्द :-**
१) न्याहरी, अल्पोपहार
४) पत्थर
६) लोकनाट्यातील कलाकार
१०) सामान
११) विश्रांती, थांबणे
१३) हत्तीचे संथ चालणे
१५) अंधार
१६) अरण्यवास
१८) एक सुगंधी वनस्पती
१९) मूल्य
२१) सोन्याचा धागा
२२) स्वाक्षरी
२३) शुद्ध, न्यायाचा, प्रामाणिक
२४) घोडा
२५) अंगरखा
२७) भेग बुजविणारी वा वाढविणारी खुंटी
२८) फिकीर
२९) पोलिस
३१) पालनपोषण
३४) पुत्र, मुलगा
३६) मनाचा ओढा
३७) धनी
३८) लाकूड कापण्याचे साधन
४०) हिंदीत शपथ
४१) मार्ग, रस्ता
४४) पातळ खांब
४६) श्रेष्ठ पुरुष
४७) पळून जाणे
५०) पालिकेतील लोक प्रतिनिधी
५३) व्यय
५५) सातूचे पीक
५७) पराजय
५९) ज्ञात होणे, आकलन होणे
६१) सैन्याची तुकडी
६३) फळातील मगज
६४) आजीची आई
६६) दरवाजा
६७) धान्याचे जाडसर पीठ
६८) चलाख, हुशार
६९) माल साठविण्याची जागा
७०) गणपतीचे एक नाव

**उभे शब्द :-**
१) पार्वतीचे एक नाव
२) पदर
३) रविवासर
४) धाप, धमकी
५) ढाळ, उतरणे, टेकडी
६) टिकून राहणे
७) कवडीमोल
८) गाणे
९) रम्य
१२) ढीग
१४) पं.नेहरुंजींचे नाव
१७) दृष्टीभेट
१८) राजा
२०) चर्चा
२४) भारवाहक
२६) विरोध, प्रतिबंध
२८) शोध, माग
३०) भिंतीवर सरपटणारा प्राणी
३२) अर्धांगवायू
३३) पर्वत
३५) हानी, तोटा
३७) माणूस
३९) प्रधान, अमात्य
४०) करवतीने लाकूड कापणारा
४२) गाडीचे छत
४३) चरण
४५) नूतन
४६) पहारेकरी
४८) लाजणारा
४९) नटात श्रेष्ठ, परमेश्वर
५१) गरजू मनुष्य
५२) सैन्य
५४) व्यायाम
५६) बारा वर्षांचा काळ
५७) परंतु, अट
५८) परमेश्वर
६०) धार्मिक उत्सव
६२) टिंगल, उपहास
६४) प्रतिष्ठा, अब्रू
६५) प्राण
६७) काढलेली सुट्टी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ल | फं | गा | ■ | भा | ग्य | वा | न | ■ | न | ज | र | बा | ज |
| हा | ■ | ढ | ग | ळ | ■ | रं | ग | प | ट | ■ | पे | ला | ■ |
| न | र | व | र | ■ | न | वा | र | ■ | रा | क | ट | ■ | ज |
| सा | ज | ■ | ज | र | त | र | ■ | सा | ज | रा | ■ | को | न |
| ■ | नी | र | ■ | त | म | ■ | क | र | ■ | ल | घु | को | न |
| अ | ना | थ | ■ | ■ | स्त | व | न | ■ | सा | ■ | मा | ■ | म |
| सा | थ | ■ | चा | ल | क | ■ | का | न | व | ला | ■ | घ | र |
| धा | ■ | ग | ■ | गा | ■ | ना | च | ■ | का | ■ | स्ने | ■ | ण |
| र | म | त | ग | म | त | ■ | ल | ह | र | ब | ह | र | ■ |
| ण | ■ | का | ल | ■ | प | य | ■ | र | ■ | स्ता | ■ | द | र |
| ■ | अ | ल | ब | त | ■ | ज | न | क | ज | न | नी | ■ | क्त |
| र | सा | ■ | त | स | ल | मा | त | ■ | न | ■ | ज | र | दा |
| म | ध्य | म | ■ | न | ■ | न | ■ | सां | ■ | ■ | मो | ■ | न |
| णा | ■ | ग | व | स | णे | ■ | त | ड | का | फ | ड | की | ■ |

**या वर्षीचा अर्थसंकल्प ना फार सकारात्मक आहे, ना फार नकारात्मक. अपेक्षा आणि वास्तव यांची सरमिसळ असलेला हा अर्थसंकल्प पाहिला असता 'फार काही मिळेल अशी अपेक्षा नव्हती' अशी प्रतिक्रिया हटकून उमटली. त्यामुळे त्याचे वर्णन खट्टा-मीठा अर्थसंकल्प असे करावे लागेल. सामान्य माणसाच्या आजच्या अपेक्षा फारशा पूर्ण न करणारा पण भविष्याची नेमकी दिशा दाखवणारा असा हा अर्थसंकल्प आहे.**

# खट्टा-मिठा अर्थसंकल्प

**अजय वाळिंबे**

या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पाकडे पाहताना 'अपेक्षा काय होत्या आणि काय मिळालं?' असा प्रश्न साहजिकच पडतो. मात्र प्रामाणिकपणे विचार केला तर या अर्थसंकल्पातून फार काही धक्कादायक किंवा क्रांतिकारी मिळेल, अशी आशा बहुतेकांनी बाळगली नव्हती. कारण याची पार्श्वभूमीच तशी होती. मागील वर्षी अर्थसंकल्प सादर झाला तेव्हा देशात सार्वत्रिक निवडणुकांचे वातावरण होते. त्या वेळी नव्या कररचनेप्रमाणे बारा लाख रुपयांपर्यंत करमुक्त उत्पन्नाची मर्यादा आणि ७५ हजार रुपयांचे स्टँडर्ड डिडक्शन देऊन मध्यमवर्गाला मोठा दिलासा देण्यात आला होता. म्हणजेच एकूण १२ लाख ७५ हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्या व्यक्तींना प्रत्यक्षात आयकर भरावा लागत नव्हता. त्यामुळे यंदा अपेक्षा होत्या, पण फार मोठ्या नव्हत्या. उदाहरणार्थ, स्टँडर्ड डिडक्शन ७५ हजार रुपयांवरून एक लाखांपर्यंत वाढवले जावे, सीनियर सिटीझन्ससाठी मेडिक्लेम प्रीमियमवर अधिक सवलत मिळावी, जुन्या कररचनेतील ५० हजारांची सूट एक लाख रुपयांपर्यंत केली जावी, ८० सी अंतर्गत असलेली दीड लाख रुपयांची मर्यादा तीन लाख रुपयांपर्यंत वाढवावी किंवा गृहकर्जावरील व्याजाची दोन लाखांची मर्यादा तीन ते पाच लाखांपर्यंत न्यावी अशा अपेक्षा चर्चेत होत्या. मात्र या अपेक्षा पूर्ण होतील, अशी खात्री कुणालाही नव्हती आणि प्रत्यक्षातही त्या पूर्ण झाल्या नाहीत.

या अर्थसंकल्पाचे मूल्यमापन करताना जागतिक परिस्थिती दुर्लक्षित करून चालणार नाही. २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र व्हावे, या दृष्टीने सरकार पावले टाकत आहेत. त्यासाठी आर्थिक वाढीचा दर दीर्घकाळ आठ टक्क्यांच्या आसपास राखावा, हे स्वप्न सरकारने मांडले आहे. मात्र सध्याची जागतिक स्थिती पाहता ते आव्हानात्मक ठरत आहे. अमेरिकेची वाढती टॅरिफ पॉलिसी, 'अमेरिका फर्स्ट' धोरण, युरोपमधील अस्थिरता, विविध ठिकाणी सुरू असलेली युद्धे या सगळ्यांचा थेट परिणाम जागतिक व्यापार आणि गुंतवणुकीवर होत आहे. भारताचा जीडीपी वाढीचा दर अजूनही तुलनेने चांगला असला तरी तो खाली येत असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. सध्या हा दर सुमारे ६.८२ टक्क्यांवर आला आहे. जीडीपीचा आकडा मोठा दिसत असला तरी दरडोई उत्पन्न मात्र अजूनही अपेक्षेइतके वाढलेले नाही. त्यामुळे देशांतर्गत आणि जागतिक परिस्थिती लक्षात घेता सरकार फार मोठे धाडसी आर्थिक प्रयोग करेल, अशी अपेक्षा ठेवणे वास्तववादी नव्हते. त्या अर्थाने हा अर्थसंकल्प 'मर्यादांमध्ये राहून' मांडलेला आहे. गेल्या पाच वर्षांचा विचार केला तर प्रत्येक अर्थसंकल्पाला एक विशिष्ट थीम दिलेली दिसते. कधी 'सप्तर्षी', कधी 'दहा खांब' तर कधी 'सहा खांब'. यंदाही ती परंपरा कायम आहे. यंदाची थीम आहे 'तीन कर्तव्यपथ'.



या वर्षीच्या अर्थसंकल्पातील हे तीन कर्तव्यपथ म्हणजे आर्थिक विकासाला गती देणे, 'सबका साथ, सबका विकास' या तत्त्वाची अंमलबजावणी आणि लोकांच्या आकांक्षा पूर्ण करून त्यांची क्षमता वाढवणे. यंदाचा अर्थसंकल्प या संकल्पनेवर बेतलेला असला तरी त्यात नेहमीचेच 'घिसे पिटे मुद्दे' मांडलेले दिसतात. या चौकटीत सरकारने सहा प्रमुख उद्योगक्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे. या अर्थसंकल्पात बायोफार्मा क्षेत्रासाठी पुढील पाच वर्षांमध्ये सुमारे दहा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा करण्यात आली. सेमीकंडक्टर उद्योगासाठी तर तब्बल ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथे दुर्मिळ खनिज उत्खननासाठी विशेष केंद्रे उभारली जाणार आहेत. पायाभूत सुविधांसाठी एकूण खर्च सुमारे १२.५ लाख कोटी रुपयांच्या आसपास ठेवण्यात आला आहे. कंटेनर उत्पादनासाठी दहा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. याशिवाय सात नवे रेल्वे कॉरिडॉर्स उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र महाराष्ट्राच्या वाट्याला यात फारसे काही आले नाही. पुणे-मुंबई हाय-स्पीड कॉरिडॉर आणि पुणे-हैदराबाद कॉरिडॉर एवढ्यापुरताच हा लाभ मर्यादित आहे. लोकांच्या आकांक्षा पूर्ण करून त्यांची क्षमता वाढवणे या संकल्पनेच्या अंतर्गत 'क्रि एटिंग चॅम्पियन्स' ही योजना या अर्थसंकल्पात जाहीर केली गेली. यात लघु आणि मध्यम उद्योगांसाठी १२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातील दहा हजार कोटी रुपये लघु व मध्यम उद्योगांसाठी, तर दोन हजार कोटी रुपये सूक्ष्म उद्योगांसाठी आहेत. त्याचप्रमाणे 'कॉर्पोरेट मित्र' ही नवी संकल्पना पुढे आली आहे.

चार्टर्ड अकाउंटंट, कॉस्ट अकाउंटंटसारख्या व्यावसायिक संस्थांच्या माध्यमातून मायक्रो उद्योगांना मार्गदर्शन करण्याचा उद्देश आहे. छोटे अभ्यासक्रम तयार करून छोट्या उद्योगांना अनेक बाबतीत मदत करण्याचा हा प्रकल्प नक्कीच चांगला आहे. त्यामुळे छोट्या उद्योगांना मोठ्या व्यावसायिकांकडे जावे लागणार नाही. ही प्रक्रिया लवकरच सुरू होईल. काहीशी वेळखाऊ असली तरी रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने दीर्घकाळात तिचे सकारात्मक परिणाम दिसू शकतात. पुढील काळात देशात वीस नवे जलमार्ग विकसित केले जाणार असून बनारस आणि पटणा येथे जहाज दुरुस्ती केंद्रे उभारली जाणार आहेत. वस्त्रोद्योग आणि हातमाग विकासासाठी 'महात्मा गांधी ग्राम स्वराज अभियानां'तर्गत दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पर्यटन क्षेत्रासाठी १५ पुरातत्व स्थळांची निवड करण्यात आली असून मार्गदर्शकांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. मात्र दुर्दैवाने या यादीतही महाराष्ट्राचा समावेश नाही. आरोग्य क्षेत्रात 'मेडिकल टुरिझम' ही नवी संकल्पना मांडण्यात आली आहे. पाच विशेष केंद्रे उभारली जाणार असून तीन आयुर्वेदिक संस्था उभारण्यात येणार आहेत. मानसिक आरोग्यासाठी उत्तर भारतात विशेष संस्था उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. कॅन्सर आणि मधुमेहावरील काही औषधे स्वस्त होणार आहेत. आत्मनिर्भर भारत योजनेसाठी २००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे तर पाच लाख लोकसंख्या असलेल्या लहान शहरांमध्ये पायाभूत सुविधा आणि शहर विकासासाठी विशेष तरतूद केली गेली आहे.

शिक्षणासाठी पाच 'एज्युकेशनल हब्स' उभारण्याचा प्रस्ताव आहे. परदेशी विद्यापीठांशी संलग्नता ठेवून भारतातच दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आहे. मात्र हे हब नेमके कुठे असणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. यामुळे परदेशात जाऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होईल आणि भारतीय गुणवत्ता भारतात राहील अशी अपेक्षा आहे. मात्र यासाठी असलेल्या नियमाबद्दल लवकरच स्पष्टता येईल असे वाटते. ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षण, आयटीआय किंवा स्वयंरोजगाराभिमुख शिक्षणावर मात्र ठोस उल्लेख नाही, ही मोठी उणीव आहे. या अर्थसंकल्पावर टीका करायची झाल्यास शेतीसाठी काहीही विशेष नवीन नसल्याचे स्पष्टपणे दिसते. एआय-आधारित तंत्रज्ञान, उत्पादकता वाढवणे, ग्रामीण उद्योग हे शब्द आहेत. पण त्यामागील ठोस कृती आराखडा मात्र अस्पष्ट आहे. सीनियर सिटीझन्ससाठी स्वतंत्र मोठ्या सवलती नाहीत. मध्यमवर्गालाही थेट मोठा दिलासा मिळालेला नाही. खरे तर, हा वर्ग देशातील सर्वात मोठा मतदारवर्ग आहे, हे वास्तव दुर्लक्षित करता येत नाही.

शेअर बाजारात ऑप्शन ट्रेडिंगवर कर लावण्यात आल्यामुळे बाजारात तात्पुरती घसरण झाली, पण ती दीर्घकाळ टिकणार नाही असा अंदाज आहे. हा कर काहीसा आवश्यक होता. शेअर बाजारात ऑप्शन ट्रेडिंगमध्ये फार वेगाने, मोठ्या प्रमाणावर, विशेषतः नवख्या गुंतवणूकदारांकडून सट्टेबाजी वाढली होती. काही वेळा यामुळे अचानक तोटा होऊन आर्थिक अडचणी निर्माण होत होत्या. ऑप्शन ट्रेडिंगचे प्रमाण प्रचंड असल्यामुळे थोडासा कर लावला तरी सरकारला मोठे उत्पन्न मिळते. त्यामुळे परदेशी फंड आणि परदेशी गुंतवणूकदार पूर्वीपेक्षा अधिक वेगाने इकडे वळतील अशी अपेक्षा आहे. बायबॅक संकल्पनेत बदल झाल्यामुळे कंपन्यांवरील करभार वाढणार आहे. कंपनीने शेअर्स बायबॅक केल्यास ग्राहकासाठी तो डिव्हिडंड गणला जाऊन त्यावर टॅक्स बसत असे. परंतु आता हे उत्पन्न कॅपिटल गेन म्हणून विचारात घेतले जाणार आहे. कंपनीला मात्र त्यावर २२ टक्क्यांऐवजी तीस टक्के टॅक्स भरावा लागेल.

आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे. अघोषित संपत्तीची मर्यादा १ कोटी करण्यात आली आहे. तसेच त्यावर कर भरण्याची तरतूदही करण्यात आली आहे. आजपर्यंत लहान गुंतवणूकदारांना १५एच आणि १५जी हे फॉर्म्स भरावे लागत असत. ते त्यांना प्रत्येक कंपनीला आणि प्रत्येक बँकेला द्यावे लागत. आता मात्र त्यांनी डिपॉझिटरीकडे हा फॉर्म भरून दिला की प्रत्येक कंपनीला वेगळा फॉर्म भरून द्यायची गरज नाही. कर न देणाऱ्या लहान गुंतवणूकदारांची ही मोठी सोय झाली आहे.

आणखी एका गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ती म्हणजे परदेशात शिक्षण किंवा प्रवासासाठी लागणाऱ्या खर्चावरील टीसीएसमध्ये मोठी सवलत देण्यात आली आहे. मागील वर्षी हा कर पाच आणि वीस टक्के होता. मात्र आता त्यावरची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे आणि तो फक्त दोन टक्के करण्यात आला आहे. ही बाब सामान्य नागरिकांसाठी नक्कीच दिलासादायक आहे. 'एनआरआय'ना आता एफपीआयद्वारे भारतात थेट गुंतवणूक करता येईल. त्याचप्रमाणे त्यांची गुंतवणूक मर्यादा पाच टक्क्यांवरुन दहा टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. देशातली गुंतवणूक वाढावी यासाठी सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे हे यावरून स्पष्ट होते. या अर्थसंकल्पात मोठ्या शहरांसाठी एका इन्सेंटिव्ह योजनेची तरतूद आहे. शहर सरकार म्हणजे महानगरपालिका बँकेकडून कर्ज घेण्याऐवजी म्युनिसिपल बाँड काढून थेट लोकांकडून किंवा गुंतवणूकदारांकडून पैसे उभारते आणि त्या बदल्यात व्याज देते. हा पैसा शहरातील पायाभूत सुविधांसाठी वापरला जातो. महापालिकेमार्फत एक हजार कोटी रुपयांचे म्युनिसिपल बाँड काढणाऱ्या शहरांना शंभर कोटी रुपयांचा इन्सेंटिव्ह जाहीर केला गेला आहे. तर छोट्या शहरांना २०० कोटींच्या म्युनिसिपल बाँडवरदेखील इन्सेंटिव्ह दिला जाणार आहे. या अर्थसंकल्पात काय नाही? या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला 'निर्गुंतवणुकी'कडे निर्देश करावा लागेल. सरकारने सरकारी कंपन्यांमधून आपली गुंतवणूक काढून घेण्याविषयी घोषणा केली होती. नव्या अर्थसंकल्पात मात्र त्याचा काहीही उल्लेख नाही. एकूणच हा अर्थसंकल्प आहे त्यापेक्षा फार वेगळे चित्र उभे करू शकला नाही, हे वास्तव नाकारता येणार नाही. **

# 'शिक्षक संघटना -अन्याय आणि शोषणाविरुद्धचे संवैधानिक अभेद्य कवच'

**धनंजय शेटये**

'शिक्षक' म्हणजे केवळ नोकरी करणारा मनुष्य नव्हे, तर तो ज्ञानदीप हातात घेऊन अज्ञानाचा अंधार दूर करणारा खरा गुरु असतो. तो शाळेच्या चार भिंतीत उभा असला, तरी त्याचे कार्य संपूर्ण समाजाच्या भवितव्याला आकार देणारे असते. मातीला आकार देणाऱ्या कुंभाराप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांच्या कच्च्या व्यक्तिमत्त्वाला संस्कार, शिस्त, मूल्ये आणि विचारांची दिशा देतो. त्याच्या शब्दांतून केवळ धडा शिकवला जात नाही, तर जीवनाचा अर्थ उमलतो; त्याच्या शिकवणीतून केवळ ज्ञान वाढत नाही, तर मनुष्यत्व फुलते.

डॉक्टरांच्या हातातील उपचारकौशल्य, इंजिनिअरच्या मेंदूतील कल्पकता, वकिलाच्या युक्तिवादातील धार, न्यायाधीशाच्या निर्णयातील समतोल, तसेच देशाच्या पंतप्रधान, राष्ट्रपती किंवा मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वगुणांची पायाभरणी कुठेतरी एका शिक्षकाच्या वर्गखोलीत झालेली असते. समाजातील प्रत्येक मोठ्या व्यक्तिमत्त्वामागे एखादा शिक्षक शांतपणे उभा असतोन दिसणारा, पण घडविणारा. शिक्षक हे व्यक्तिमत्त्वनिर्मितीचे शिल्पकार, संस्कारांचे शेतकरी आणि ज्ञानाच्या गंगेचे अखंड प्रवाहक असतात.

त्यामुळे शिक्षकांचे स्थान हे केवळ व्यावसायिक नाही, तर सांस्कृतिक आणि नैतिक अधिष्ठानाचे आहे. ते समाजाचे दिशादर्शक दीपस्तंभ आहेत, जे स्वतः जळून इतरांना प्रकाश देतात. त्यांच्या कष्टांचे मोल पदांनी किंवा पगाराने मोजता येत नाही, कारण ते भविष्य घडवितात. खरे तर, 'शिक्षक घडतो, तेव्हा पिढ्या घडतात; आणि पिढ्या घडल्या, की राष्ट्र उभे राहते.' म्हणूनच शिक्षक हा समाजाच्या प्रगतीचा मूळ आधारस्तंभ आणि संस्कृतीचा शाश्वत रक्षक आहे.

भारतीय लोकशाहीच्या भव्य रचनेत अनुच्छेद १९(१)(क) हा केवळ एक कायदेशीर प्रावधान नाही, तर तो सामान्य नागरिकाच्या सामूहिक शक्तीचा शाश्वत श्वास आहे. 'संघटना स्थापन करण्याचा अधिकार' हा शब्दशः वाचला, तर तो साधा वाटू शकतो; परंतु व्यवहारात तो अन्यायाच्या अंधारात उभा राहणारा प्रकाशस्तंभ आहे. शिक्षक संघटना म्हणजे केवळ नावनोंदणीची यादी नव्हे, तर ती अन्यायाविरुद्ध उफाळून येणारी सामूहिक जाणीव, एकत्रित स्वाभिमानाचा ज्वालामुखी आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करणारी सजीव भिंत आहे.

शैक्षणिक क्षेत्र, जे ज्ञान, संस्कार आणि चारित्र्यनिर्मितीचे पवित्र क्षेत्र मानले जाते, तिथेही दुर्दैवाने सत्तेचा गैरवापर, गटबाजी, वशिलेबाजी आणि श्रेयलालसा यांचे सावट दिसू लागते. एकटा शिक्षक कितीही विद्वान, तत्त्वनिष्ठ किंवा कर्तव्यपरायण असला, तरी प्रशासकीय दडपशाहीच्या वादळात तो असहाय्य ठरू शकतो. व्यवस्थापनाचे एकतर्फी निर्णय, वाढीव कामाचा बोजा, वेतनातील विसंगती, मानसिक छळ किंवा अपमानास्पद वागणूक या सर्व गोष्टी शिक्षकाच्या केवळ सेवाशर्तींचे नव्हे, तर त्याच्या आत्मसन्मानाचेही हनन करतात. अशा वेळी वैयक्तिक प्रतिकार अपुरा पडतो; तेव्हा संघटनात्मक ऐक्यच त्याचे खरे बळ ठरते.

इथेच सामुदायिक सौदेबाजी या तत्त्वाची प्रचिती येते.



महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९८१आणि संबंधित नियमावली शिक्षकांना अनेक कायदेशीर संरक्षणे देतातपरंतु कायदा कागदावर जिवंत नसतो; त्याला कृतीची नाडी संघटना देते. संघटना ही कायद्याला कार्यरूप देणारी सजीव यंत्रणा आहे. ती नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन व्हावे यासाठी उभी राहते, शिस्तभंग कारवाईत प्रक्रियात्मक न्याय सुनिश्चित करते आणि व्यवस्थापनाला उत्तरदायी ठेवते. त्यामुळे संघटना ही केवळ भावनिक नव्हे, तर वैधानिक कवच ठरते.

आज अनेक संस्थांमध्ये गुणवत्तेपेक्षा गटसत्ता महत्त्वाची ठरते. श्रेय घेण्याची स्पर्धा, गुणवत्ता नसतानाही कर्मधर्मसंयोगाने सुपरवायझर बनलेले काही शिक्षक,शिक्षिका आपल्या जवळच्या नातेसंबंधांवर आधारित नातेवाईकांच्या नियुक्त्या करुन नातेवाईक, संप्रदाय लॉबी बनवून मग त्यांचे अतिलाड केले जातात. लालची संस्कृती वाढत जाते आणि मग कार्यक्षम शिक्षकांवर टाकला जाणारा अन्याय्य बोजा या गोष्टी शिक्षणाच्या पवित्र ध्येयालाच बाधा आणतात. अशा वातावरणात प्रामाणिक शिक्षक मानसिक ताण, असुरक्षितता आणि अपमानाच्या छायेत काम करतो. त्याच्या मनातील अध्यापनाचा उत्साह करपतो; आणि जेव्हा शिक्षकच खचतो, तेव्हा समाजाचे भविष्यच डळमळते.

परंतु निराशेच्या या काळोखात शिक्षक संघटना आशेचा दीप बनून उभी राहते. ती सांगते "तू एकटा नाहीस." ती खचलेल्या शिक्षकाला मानसिक आधार देते, कायदेशीर मार्गदर्शन करते आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे धैर्य देते. वैयक्तिक वेदनेचे सामूहिक शक्तीत रूपांतर करण्याची ही प्रक्रिया म्हणजेच संघटनात्मक चळवळ. संघटना शिक्षकांच्या हक्कांचे रक्षण करताना त्यांच्या स्वाभिमानालाही कवेत घेते.

शिक्षक संघटना म्हणजे केवळ वेतनवाढीसाठीचा संघर्ष नाही; ती लोकशाहीतील समतोल राखण्याची प्रक्रिया आहे. ती सुशासनाची हमी आहे, उत्तरदायित्वाची जाणीव आहे आणि शिक्षण व्यवस्थेच्या नैतिक अधिष्ठानाचे संरक्षण आहे. जिथे ज्ञानाचा दीप प्रज्वलित होतो, तिथे अन्यायाचा अंधार नांदू नयेहीच संघटनात्मक विचारधारा आहे.

शेवटी, शिक्षकांचे ऐक्य हेच त्यांचे खरे सामर्थ्य आहे. एक शिक्षक खचू शकतो, पण संघटित शिक्षक समाजाचा कणा बनतो. ऐक्याची ताकद केवळ आवाज वाढवत नाही; ती न्यायाला दिशा देते. शिक्षक संघटित झाला, की केवळ त्याचे हक्क सुरक्षित होत नाहीत, तर लोकशाहीची पायाभरणी अधिक मजबूत होते.

**

# हक्कापासून परिणामांपर्यंत : मनरेगाची जागा व्हीबीग्रामजीने घेण्यामागील कारण

**राज्याची रोजगार सहाय्य देण्याची जबाबदारी काढून घेत नाही; ती जबाबदारी नव्या पद्धतीने संरचित करतेकालमर्यादा बंधनकारक करून, निधीला परिणामांशी जोडून आणि उत्तरदायित्व संस्थात्मक करून.**



**निर्वा मेहता**

निर्वा मेहता या एक राजकीय विश्लेषक आणि स्तंभलेखिका आहेत, ज्या सार्वजनिक धोरण, सुशासन आणि राष्ट्रीय सुरक्षेवर लिहितात. त्यांचे कार्य भारतातील आणि भारताबाहेरील सत्ता संरचना, राज्यांचे वर्तन आणि धोरणात्मक निवडींच्या दीर्घकालीन परिणामांवर केंद्रित आहे.

हा विचारातील बदल सूचित करतो. सार्वजनिक खर्चाला टिकाऊ ग्रामीण समृद्धीत रूपांतरित करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा आहे.सार्वजनिक धोरणांचे मूल्यमापन भावना, आठवणी किंवा राजकीय प्रतीकांवर नव्हे, तर प्रत्यक्ष परिणामांवर आधारित असले पाहिजे. मनरेगाच्या जागी विकसित भारत रोजगार व आजीविका मिशन ग्रामीण अधिनियम, २०२५ लागू केल्यामुळे अपेक्षितच आंदोलन आणि निषेध झाले आहेत.



टीकाकारांचा दावा आहे की हा नवा कायदा हक्काधिष्ठित चौकट कमकुवत करतो, राज्यांवर आर्थिक ओझे टाकतो, सत्तेचे केंद्रीकरण करतो आणि महात्मा गांधींची परंपरा पुसून टाकतो. मात्र हे आक्षेप प्रत्यक्ष धोरणरचनेपेक्षा राजकीय भूमिकांबद्दल अधिक बोलके आहेत. हक्काधिष्ठित व्यवस्थेचा नाश करतो, हा मुख्य दावा एका चुकीच्या गृहितकावर आधारलेला आहे की कायदेशीर हक्क आपोआप सक्षमीकरणात रूपांतरित होतो. मनरेगाचा जवळपास वीस वर्षांचा अनुभव या समजुतीच्या मर्यादा स्पष्ट करतो. मजुरी देण्यात होणारे सातत्याने विलंब, अपुरी रोजगारमागणी, निकृष्ट मालमत्ता निर्मिती आणि असमान अंमलबजावणी यांमुळे "न्यायालयीन हक्क" म्हणून मांडलेली संकल्पना हळूहळू पोकळ झाली. जो हक्क वेळेवर, पुरेशा प्रमाणात आणि सातत्याने देता येत नाही, तो प्रत्यक्ष व्यवहारात हक्क राहात नाही.

राज्याची रोजगार सहाय्य देण्याची जबाबदारी काढून घेत नाही; ती जबाबदारी नव्या पद्धतीने संरचित करतेकालमर्यादा बंधनकारक करून, निधीला परिणामांशी जोडून आणि उत्तरदायित्व संस्थात्मक करून. हे दुर्बलकरण नाही, तर दुरुस्ती आहे.

याहून महत्त्वाचे म्हणजे, हा नवा कायदा भारताच्या विकासविचारातील आवश्यक बदल दर्शवतो. मनरेगा तीव्र ग्रामीण संकटाच्या काळात दिलासा देणारी योजना म्हणून आखली गेली होती. संकटकालीन रोजगाराला ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कायमस्वरूपी वैशिष्ट्य मानणे म्हणजे ठप्पपणालाच सामान्य मान्यता देणे होय. अल्पकालीन रोजगाराला दीर्घकालीन आजीविका निर्मिती, कौशल्यविकास आणि उत्पादक मालमत्ता उभारणीशी स्पष्टपणे जोडतो. कामाचे दिवस मोजण्यापेक्षा शाश्वत आजीविका उभारण्याकडे केलेला हा बदल एक मूलभूत सत्य मान्य करतोकी प्रतिष्ठा केवळ रोजगारातून नाही, तर उत्पन्नातील स्थैर्य, उत्पादकता आणि प्रगतीच्या संधींतून मिळते.

जुन्या व्यवस्थेत केंद्राकडून निधी उशिरा मिळणे, अनियोजित देणी आणि खर्चवाटपावरील वाद यांमुळे राज्यांना सतत अनिश्चिततेला सामोरे जावे लागत होते. मध्ये स्पष्ट आर्थिक जबाबदाऱ्या, मध्यमकालीन नियोजन आणि परिणामाधारित निधीपुरवठा यांचा समावेश आहे.

सर्वात भावनिक टीका म्हणजे कायद्याच्या नावातून महात्मा गांधींचे नाव वगळल्याची. हा युक्तिवाद आशयाऐवजी प्रतीकांवर भर देतो. गांधीजींचे आर्थिक तत्त्वज्ञान उत्पादक श्रम, स्वावलंबन, विकेंद्रित विकास आणि नैतिक जबाबदारी यांवर आधारित होते.

सुधारणांना विरोध होणारच, विशेषतः त्या खोलवर रुजलेल्या राजकीय कथानकांना धक्का देत असतील तेव्हा. पण सामाजिक धोरण काळात गोठवून ठेवता येत नाही. हा ग्रामीण रोजगार धोरणाला इनपुट-केंद्रित हक्कापासून परिणामाभिमुख हमीकडे नेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आहे. **

# त्यागमूर्ती माता रमाई आजच्या महिलांचे प्रेरणास्थान होतील काय?

सागर तायडे

आजच्या महिला विशेष धम्म उपासिका म्हणून घेणाऱ्या काही महिला जानेवारी २०२६ च्या महानगरपालिका निवडणुकीत अनेक विचारधारा असणाऱ्या पक्षाच्या उमेदवाराचे झेंडे पांचशे, हजार रुपये मजूरी घेऊन खांद्यावर घेऊन फिरतांना दिसल्या. त्यांची निवडणूक आयोगाच्या व्हिडिओ मध्ये दखल घेऊन नोंद झाली आहे. तशीच स्थानिक कार्यकर्ते, सामाजिक बांधिलकी ठेऊन काम करणाऱ्या माझासारख्या पत्रकाराच्या नजरेत ही बाब सुटली नाही.त्यामुळेच आंबेडकरी चळवळीचे बल्ले किल्ले म्हणून नोंद असलेल्या नगरातील मतदान आपल्या उमेदवाराला मिळाले नाही. मग गेले कुठे?. माता रमाईचा त्याग,कष्ट आणि जिद्ध आमच्या महिलांना प्रेरणादायी आहे काय हा प्रश्न माझ्या समोर आहे. म्हणूनच मी माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या (७ फेब्रुवारी इ.स. १८९८) जयंती निमित्याने आजच्या महिलांचे प्रेरणा स्थान होतील काय? हे विचारत आहे. स्थानिक कार्यकर्त्यांनी या गोष्टीची दखल घेऊन समीक्षा केली पाहिजे.

कष्टकरी महिलांचे प्रेरणा स्थळ कष्टकरी महिला नेहमी आपल्या पतिदेवाला सर्वच कामात सतत मदत करीत असतात.अशा महिलांचे प्रेरणा स्थान म्हणजे त्यांगमूर्ती माता रमाई.माता रमाई बाबत आज पर्यत अनेक प्रकारचे लिखाण हे भावनिकच झाले आहे. रमाबाईच्या कष्टाला, त्यागाला भावनिक केल्या गेले आहे.भिमराव आंबेडकर यांना जी साथ मिळाली ती भावनिक कधीच नव्हती ती पतीच्या कर्तव्य दक्षतेला मनापासुन पत्नीची साथ होती.ती प्रेरणा खेडया पडयातील व शहरातील झोपड़पट्टीत राहणाऱ्या कार्यकर्त्याच्या पत्नीनी घेतली म्हणुन ते आंबेडकर चळवळीतील प्रत्येक जन आंदोलनात पति पत्नी सहभागी होतात.विशेष ते सर्वच असंघटित नाका कामगार, घर कामगार असतात. पण असंघटित घर कामगार म्हणुन ते कोणतेही आंदोलन करीत नाही.त्याची त्यांना जाणीव नाही.



रमाबाई आणि भिमरावचे सर्व नातलग कोणते कामगार होते? रमाबाई बदल जेवढा आदर अडानी असंघटित महिला ठेवतात तेवढा सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्या आणि सुरक्षित ठिकाणी राहणाऱ्या महिला ठेवत नाही. अशा महिला आपल्या पतीला बिनपगारी कोणतेही काम करू देत नाही.(देत असतील अशा त्या महिलांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांची माफी मांगुन) आज पर्यतचा इतिहास लिहतो. अन्यथा आंबेडकर चळवळीत आज जी लेटरहेड वर जागणाऱ्याची जी संख्या आहे. ती राहली नसती. प्रत्येक यशस्वी पुरुषा मागे एका महिलाचा हात असतो, तसाच एका अपयशस्वी पुरुषा मागे एका महिलांचा हात असतो. मग घराघरात असलेल्या आंबेडकर चळवळीतील गटागटच्या नेत्यांच्या महिलाचे प्रेरणा स्थान कोणते? रमाबाई ह्या बाबासाहेब याच्या प्रत्येक आंदोलनात मनाने सहभागी होत्या पण शरीराने नाही.मुलगा आजारी आहे घरात पैसा अदला नाही.नवरा तिकडे समाजसेवा करतो. असे सहन करणारी महिला आज शोधून सापडणार नाही. त्या आजारात मुलगा मरण पावतो तरी ती महिला विचलीत होवुन नवऱ्या बाबत राईचा पर्वत बनवित नाही. परिस्थिती समजुन घेते. याला भावनिक मुद्दा कसा म्हणता येईल?. हा समंजसपणा, दूरदृष्टिपणा होता. त्याला दुरदुष्टी म्हणता येईल.हा मंत्र आज महिलांनी घेणे गरजेचा आहे.


आज समाज ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत त्याचे (बाबासाहेबाचे) कुटुंब आहे. त्याकाळी बाबासाहेब आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलावी यासाठी शिकत नव्हते तर समाजाची एकूण सर्व परिस्थिती बदलण्या करीता शिकत होते.हे माता रमाबाई समजू शकत होती. आजची एकही माता असा विचार करणारी दिसणार नाही. संपूर्ण देश बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात होता. गांधी पुण्याला उपोषणाला बसले तेव्हा ते त्यात मरणार. त्याचा संपूर्ण राग माझ्या समाजावर निघणार याची कल्पना बाबासाहेब यांना होती.पण रमाबाईची तेव्हा मानसिक परिस्थिती काय असेल. घरात आणि बाहेर होणाऱ्या चर्चा पेपरात येणारया बातम्या रमाबाईला अस्वस्थ करीत होत्या. काय वर्णन करून ठेवले आपल्या थोर विचारवंतांनी?.

रमाबाईचा जन्म कुठे झाला, आईवडील काय करता होते,घरची गरीब परिस्थिती तिचे दुःख आजार यांचे वर्णन करणारे लेखक समाजाला काय संदेश देण्यासाठी लिहतात. बाबासाहेबांना रमाबाई ची कशी साथ होती त्यावर लक्ष केंद्रित करून लिहले पाहिजे, ते प्रेरणादायी होईल. नवरात्रात शारदा, सरस्वती, अंबिका, लक्ष्मी श्रीदेवी यांचावर लिहणारे कधीच त्यांच्या जन्म, आईबाप, भाऊ बहीण, शिक्षण, संसार, नवरा, मुलगा मुलगी, सासु सासरे, त्याने गांव तालुका जिल्हा, राज्य यांचा उल्लेख कुठेच येऊ देत नाही. त्यावेळी आजचे हिंस प्राणी वाहन कसे होते. यावर कधीच लिहल्या जात नाही. सर्व भर नवस, कडक उपवास, मनोभावे पूजा नेवैद्य यातुन होणार चमत्कार साक्षातकार प्रसंतता यांचा किती मोठा प्रभाव आजच्या उच्च शिक्षित महिलांच्या वर केला जातो.हे सिद्ध होत आहे. आपण बाबासाहेबांची रमाई कशी सांगितली पाहिजे, कष्ट, त्याग आणि जिद्दीने पती मागे उभी राहणारी त्यागमूर्ती. रमाबाईची रमाई कशी झाली किती लोकांना माहित आहे. बाबासाहेब शिक्षणा करिता आणि समाजाला मान सन्मान मिळवून देण्या करिता सतत ब्रिटिशांच्या बरोबर पत्रव्यवहार आणि गाठी भेटी घेत असत. असे एकदा राजगृहावर बाबासाहेब व रमाबाई राहत असताना त्यांना अचानक परदेशी महत्वाच्या कामानिमित्य जायचे होते. पण रमाबाईला एकटे सोडून कसे जाणार हा प्रश्न पडला होता. तेव्हा बाबासाहेबांनी आपल्या एक मित्र धारवाडच्या वराळे काका कडे रमाबाईला पाठवितात.

सिद्धार्थ हॉस्टेल वडाळा येथे राहणाऱ्या कार्यकर्त्यांची नांवे नजर खालुन घाला म्हणजे चळवळीतील कार्यकर्त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे त्यांच्या महिलांचे योगदान लक्षात येईल. म्हणुन माता रमाई आजच्या महिलांचे प्रेरणा स्थान होतील काय? त्यावेळची परिस्थिती आजची परिस्थिती किती पटीने बदलली आहे. तेव्हा चळवळीकडे पैसा नव्हता पण जीवाला जीव देणारी माणस होती. त्यांना त्यांच्या घरुन चटणी भाकर मिळत होती. आज पैसा असल्या शिवाय माणस येत नाही. आणि घरची चटणी भाकर त्यांना गोड लागत नाही. आता कष्टाला त्यागाला कुठे किंमत आहे? तेव्हा ती होती. म्हणुन अशा त्यागमूर्ती माता रमाई च्या १२८ व्या (७ फेब्रुवारी इ.स. १८९८) जयंती निमित्ताने आजच्या महिलांचे प्रेरणा स्थान होतील काय? हे विचारत आहे. सर्व मातांना त्यागमूर्ती माता रमाई च्या १२८ व्या जयंती निमित्याने हार्दिक शुभेच्छा! धन्यवाद !!! **

## दिशा दाखवणारी ...

# हेलपाटा




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

हेलपाटा, ही तानाजी धरणे यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी, ज्ञानसिंधु प्रकाशनने प्रकाशित केली आहे. या पुस्तकाला नाशिक येथील विवेक उगलमुगले यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. सत्तरऐंशीच्या दशकात जन्मलेल्या ग्रामीण भागातील बहुतांश पिढीने कमालीचे दारिद्र्य आणि अभावग्रस्तता अनुभवलेली आहे. आंबळे (आनोसेवाडी) ता. शिरूर, जि. पुणे येथील तानाजी धरणे या परिस्थितीने गांजलेल्या मुलाचे भावविश्व या कादंबरीत वाचावयास मिळते. तानाजी धरणे यांच्या नोकरी लागेपर्यंतच्या कालखंडाचा या कादंबरीत समावेश आहे. शेवटी विवेक लिहितात, 'हेलपाटा घालणं' ही एक आपत्ती न समजता इष्टापत्ती समजून यापुढेही अनेक मुलं प्रेरणा घेऊन उभे राहतील, असा आशावाद ही कादंबरी पेरते; म्हणून 'हेलपाटा' कादंबरी फार महत्त्वाची आहे. या पुस्तकाच्या सहाव्या आवृत्तीच्या निमित्ताने, तानाजी धरणे यांनीही आपले मनोगत मांडले आहे. समर्पक आणि रंगीत मुखपृष्ठ शिरीष घाटे, सोलापूर यांचे आहे.

सुरुवातीला तानाजी यांनी आपल्या घरातील सर्व सदस्यांची आणि आपल्या ग्रामीण भागाची ओळख करून दिली आहे. आईचे माहेर आणि सासर एकच असल्यामुळे आणि गावातील मामा, आईला बाई म्हणत असल्यामुळे घरातील सर्व भावंडे, आईला 'बाई' म्हणत. आंबळे हे मागासलेले गाव होते. तानाजी यांचे वडील शेतमजूर सालगडी म्हणून काम करत होते बलुतेदारी पद्धतीमुळे, विशिष्ट काळानंतर शेतमजुरांना धान्यरूपाने मोबदला मिळे. तानाजी यांना चार बहिणी आणि सर्वात मोठा भाऊ, या सर्वांचे संगोपन, सर्वांची लग्ने आणि तानाजीचे शिक्षण आई-वडिलांनी केल्याचे तानाजी सांगतात. घरातील गुरांविषयी आणि अन्य पाळीव प्राण्यांविषयी, तानाजी वेळोवेळी सांगतात. विविध ठिकाणी तानाजी यांचे बाबा, म्हणजेच भाऊ सालगडी म्हणून काम करत. प्रचंड कष्ट करूनही त्याविषयी कोणाकडेही ते तक्रार करत नसत. सर्व जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या आपल्या वडिलांविषयी तानाजी म्हणतात, ''ते जगातले सर्वात बेस्ट 'बाबा' होते.'' तानाजी यांच्या आजोबांचे अकाली निधन झाल्यामुळे भाऊंना शिक्षण पूर्ण करता आले नाही. त्यामुळे त्यांच्या आयुष्याचे गणितच चुकले. भाऊ स्वभावाने फार भोळे होते, त्यामुळे त्यांचा सर्वांनी गैरफायदा घेतला. कामासाठी गावोगावी सर्व कुटुंब चालत जात असे. पायात चप्पल नसे. अंगावरील कपडेही फाटकेतुटके असत. वडील मोलमजुरी करायचे त्यामधून येणाऱ्या मजुरीतून कशीतरी गुजराण होत असे. भाऊंनी दीर्घकाळ गुऱ्हाळावर काम केले होते. तेथील विविध अनुभव, तेथील वातावरण समजते. सुरुवातीच्या काळात तानाजी यांना शाळेत जायला आवडत नसे. कालांतराने शाळा आणि अभ्यास हा तानाजी यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक झाला. शाळेतील विविध अनुभव तानाजी यांनी सविस्तरपणे मांडले आहेत.

तानाजी यांनी आपल्या बहिणींच्या आणि मोठ्या भावाच्या लग्नाविषयी सविस्तरपणे लिहिले आहे. प्रत्येक लग्नाचेवेळी उत्तम गुरे विकावी लागली. वाढीव खर्चासाठी कर्ज घ्यावे लागले आणि ते फेडण्यासाठी सर्वांना दीर्घकाळ मोलमजुरी करावी लागली. ताईचे पती मुंबईला झोपडपट्टीत राहत होते. त्यांना खूप व्यसने होती. परिणामी दाजी अर्ध्या आयुष्यातच गेले. उन्हाळ्याच्या सुट्टीत दोन रुपये मजुरीवर तानाजी यांना काम करावे लागे. घरातील गरिबीमुळे तानाजीने शाळा सोडण्याचे ठरविले. मुंबईला जाताना, आपल्या या निर्णयाचे त्यांना अतीव दुःख झाले. मुंबईला जाऊन दाजींबरोबर दररोज २५ किलो मालाची पाटी घेऊन ते दारोदारी फिरू लागले. तेथील सविस्तर अनुभव त्यांनी लिहिले आहेत. एक महिन्याच्या अनुभवानंतर, दररोज शंभर रुपये मिळू लागले. घरी पत्र पाठवून ते आपले अनुभव कळवत. कालांतराने ते घरी आल्यावर, आजीला चार हजार रुपये मिळवल्याचे कौतुकाने सांगत होते. आजीची शाबासकी मिळण्याऐवजी, म्हणाली ''आरं तू शाळा सोडून गेलास! तुला पुन्हा शिक्षण मिळेल काय? पैसा काय रांडा पण कमावतात.'' आजीच्या या वाक्याने तानाजींचे डोळे खाडकन उघडले आणि पुन्हा शिक्षण सुरू केले. दहावीपर्यंत शिक्षण आणि नंतर बारावीपर्यंत शिक्षण विविध अडचणींवर मात करत, कसे पूर्ण केले, तेही त्यांनी मांडले आहे. शालेय वयातच तानाजी यांना कविता करण्याचा छंद लागला. त्याचेही कौतुक झाले. ''कवितेने मला जीवन जगण्याची एक वेगळीच उमेद दिली'' असे ते लिहितात.

तानाजी दहावीत गेले तेव्हा त्यांच्यासमोर वह्या, पुस्तके कशी विकत घ्यायची हा प्रश्न होता. मात्र त्यांच्या आवारी सरांनी संधी साधून संस्थेचे अध्यक्ष खा.रामकृष्ण मोरे आणि शिरूरचे प्रख्यात सोन्याच्या पिढीचे प्रमुख भवरीलाल यांना एका कार्यक्रमाचे वेळी तानाजी या विद्यार्थ्यांची अडचण सांगितली. त्यामुळे या हुशार विद्यार्थ्याला सर्व वह्या, पुस्तके आणि शाळेसाठी दोन जोड कपड्यांचे भवरीलाल यांचेकडून भेट म्हणून मिळाले. तसेच नंतर गुणवत्ता वाढवर्गाची मेसची, हॉस्टेलची सर्व फी भरून या वर्गासाठी पाठवण्यात आले. परिणामी तानाजी यांना ७१% गुण मिळाले. सरकारचे धोरण बदलल्यामुळे दहावीनंतर डी.एड. करण्याचे उद्दिष्ट तानाजी यांना पूर्ण करता आले नाही. त्यामुळे त्यांनी मांजरी फार्मला कृषी पदविकेचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे तेथील अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला. तेथील विविध अनुभवही त्यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत.

जीवनात सर्वात वाईट काळ बेकारीचा असतो आणि तो तानाजींनी अनुभवला. ग्रामसेवक भरतीसाठी फॉर्म भरल्यानंतर, परीक्षा आणि मुलाखत झाल्यानंतर, २३ जुलै १९९८ रोजी नोकरीचे पत्र आले. रायगड जिल्हा परिषद, रायगड-अलिबाग येथे ग्रामसेवक म्हणून निवड झाली. त्यावेळी तानाजी यांना हलाखीत शिक्षण घेतल्याची आठवण होऊन रडू कोसळले होते. ''हेलपाटा''कादंबरी ग्रामीण भागातील शेती क्षेत्रातील, प्रचंड गरिबीचे दर्शन घडविते. वाचक कादंबरी वाचण्यात गुंतून जातो. दीर्घ काळापूर्वी आनंद यादव लिखित ''झोंबी'' आणि ''वाट तुडवताना'' या उत्तम कांबळे यांच्या पुस्तकांतून त्यांच्या जीवनातील प्रतिकूल परिस्थितीचे दर्शन घडले होते, त्याची, ही कादंबरी वाचताना तीव्रतेने आठवण होते. तानाजी धरणे यांची ''हेलपाटा'' ही कादंबरी नितांत वाचनीय आणि विलक्षण प्रेरक आहे. ग्रामीण भागातील, प्रतिकूल परिस्थितीतील युवकांना ही कादंबरी यशाकडे जाण्याचा सुयोग्य मार्ग दाखवते आहे. कादंबरीतील बोलीभाषा विशिष्ट भूभागातील असल्यामुळे सर्वसामान्य वाचक काही शब्दांशी अडखळतो. तसेच ठळक मुद्रणदोष खटकतात. शेवटी लेखकाचा सविस्तर परिचय आणि उत्तम कांबळे आणि विविध मान्यवर वाचकांचे अभिप्राय नोंदविले आहेत. **

पुस्तकाचे नाव : हेलपाटा
लेखक : तानाजी धरणे
९९७५३७०९१२
प्रकाशक : ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक
आवृत्ती सहावी : १५ ऑगस्ट २०२५
पृष्ठे : १३६ किंमत : रु. २५०/-

# महापौर निवडीने ढवळून काढले राजकारण

**महापालिका निवडणुकांच्या सकारात्मक निकालांनंतर आपलाच महापौर व्हावा, यासाठी भाजप वेगवेगळ्या प्रकारे व्यूहरचना करत आहे. प्रसंगी महायुतीतील तीन पक्ष एकमेकांवर कुरघोडी करत आहेत. महायुतीला बहुमत मिळाल्यानंतरही महापौरपदासाठी महायुतीतच रस्सीखेच सुरू आहे. काही ठिकाणी तर महाविकास आघाडीतील काही पक्षांचीही आतून मदत घेतली जात असल्याने वेगळीच राजकीय समीकरणे आकाराला येत आहेत.**

जनार्दन पाटील

मुंबई महानगरपालिकांच्या निवडणुकीचे निकाल लागून पंधरवडा उलटला, तरी भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये सत्तावाटपाचा पेच सुटला नाही. भाजपच्या रणनीतीमुळे मुंबईच्या महापौरपदाची निवडणूक फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. राजकीय डावपेच आखत भाजपने ही प्रक्रिया लांबणीवर टाकण्यात यश मिळवले. भाजपने दुसरी खेळी अशी खेळली आहे, की महापौरपदाच्या निवडणुकीसाठी यापूर्वीपर्यंत पालिका सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक पीठासीन अधिकारी म्हणून निवडणूक घेत असत. नंतर नवनिर्वाचित महापौर हे उपमहापौर पदासाठी निवडणूक घेत असत; मात्र आता राज्य सरकारने २२ जानेवारी रोजी एक अध्यादेश काढला. त्यामुळे यापुढे जुनी कार्यपद्धती बंद करून महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी निवडणूक घेतील. त्यानंतर पुन्हा एकदा २३ जानेवारी रोजी राज्य सरकारने राज्यपालांच्या संमतीने आणि आदेशाने आणखी एक नवा अध्यादेश जारी केला. त्यामुळे मुंबईच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी म्हणून मुंबई महापालिकेचे आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी हे निवडणूक घेतील. त्यामुळे आता भविष्यातदेखील मुंबईच्या महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक ही प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी आयुक्त हेच घेतील, हे अधोरेखित झाले आहे. दरम्यान, महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत विरोधकांकडून कोणत्याही पद्धतीचा दगाफटका होण्याची शक्यता मावळल्यात जमा झाल्याचे सांगण्यात येते.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपने ८९ जागा मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून झेप घेतली, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने २९ जागा जिंकून 'किंगमेकर'ची भूमिका बजावली. महायुतीकडे स्पष्ट बहुमत असले, तरी महापौर कोणाचा आणि किती काळासाठी, यावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. यामुळेच भाजपने आपल्या नगरसेवकांची गटनोंदणी अद्याप केलेली नाही. महानगरपालिकेच्या नियमानुसार, सर्व विजयी नगरसेवकांच्या गटाची नोंदणी कोकण आयुक्तांकडे झाल्यानंतर सात दिवसांच्या आत महापौर निवडीची प्रक्रिया राबवणे आवश्यक असते; मात्र भाजपने ही नोंदणी लांबणीवर टाकल्याने प्रशासनाला निवडणूक जाहीर करता आलेली नाही. भाजपला अधिकचा वेळ मिळाल्याने शिंदे गटासोबत महापौरपद आणि स्थायी समितीच्या जागांबाबत वाटाघाटी करण्यासाठी अधिक वेळ मिळेल. अपक्ष किंवा इतर पक्षांमधील नाराज नगरसेवकांना आपल्याकडे खेचण्यासाठी संधी शोधली जाऊ शकते. उद्धव ठाकरे गटाला महापालिकेत कोणतीही राजकीय संधी किंवा महत्त्वाची पदे मिळू नयेत, यासाठी रणनीती भाजपकडून आखली जाऊ शकते. सध्या महापालिकेवर प्रशासकाचे नियंत्रण असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रशासनावर पकड असल्याने अप्रत्यक्षपणे सत्ता भाजपच्याच हाती आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मुंबईचा महापौर शिवसेनेचाच (शिंदे गट) असावा, अशी आग्रही मागणी शिंदेसेनेने केली आहे, तर सर्वात मोठा पक्ष असल्याने महापौरपद भाजपकडेच असावे, असे संकेत भाजप नेत्यांनी दिले आहेत.

पनवेल महापालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता कायम राखली असली, तरी सध्या शहराच्या राजकारणाचे लक्ष महापौरपदाच्या निवडीकडे केंद्रित झाले आहे. नुकतीच महायुतीच्या गटनेतेपदी नितीन पाटील यांची सर्वानुमते निवड झाल्यानंतर महापौरपद त्यांच्याच गळ्यात पडणार का, की पक्षांतर्गत राजकीय गणितांमुळे वेगळाच चेहरा पुढे येणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. दहा फेब्रुवारीला महापौर आणि उपमहापौरपदांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. पनवेलच्या महापौरपदाची माळ अखेर कोणाच्या गळ्यात पडते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. पाटील यांचे नाव महापौरपदासाठी आघाडीवर असले, तरी भाजपकडून अधिकृत घोषणा न झाल्याने अनिश्चितता कायम आहे. शेकापमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रीतम म्हात्रे यांच्या पत्नी ममता म्हात्रे या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भाजपच्या चिन्हावर बिनविरोध निवडून आल्या. त्यामुळे ममता म्हात्रे यांनाच महापौरपदाची संधी मिळावी, यासाठी म्हात्रे कुटुंबीयांकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. प्रीतम यांचे वडील जे. एम. म्हात्रे हे माजी खासदार रामशेठ ठाकूर तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे निकटवर्तीय असल्याने या समीकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. प्रीतम पनवेलमध्येच सक्रिय राहतील आणि उरण विधानसभा मतदारसंघातील दावेदारी कमी होईल, अशीही एक राजकीय खेळी असल्याची चर्चा आहे; मात्र यामुळे भविष्यात पनवेल विधानसभा क्षेत्रात आ. प्रशांत ठाकूर यांच्यासमोर नव्या स्पर्धकाची निर्मिती होण्याची शक्यता आहे.

आमदार ठाकूर यांच्या निकटवर्तीय असलेल्या अस्मिता घरत आणि प्रतिमा भोईर या दोन महिला नगरसेवकांची नावेही महापौरपदासाठी चर्चेत आहेत. दरम्यान, नव्याने पक्षात प्रवेश केलेल्याला थेट महापौरपद दिल्यास भाजपमधील दोन वेळा निवडून आलेले अनुभवी व उच्चशिक्षित नगरसेवक नाराज होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सध्याचा निर्णय घेताना भविष्यातील राजकीय



समीकरणांचा विचार करून भाजपचे वरिष्ठ नेते सावध भूमिका घेत असल्याचे दिसून येते. उल्हासनगर महापालिकेमध्ये महापौर भाजपचा की शिंदेसेनेचा याबाबत संभ्रम कायम असून भाजपने महायुतीचा महापौर होणार असल्याचे संकेत दिले. उल्हासनगर महापालिकेत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. ७८ पैकी भाजपचे सर्वाधिक ३७ तर शिंदेसेनेचे ३६ नगरसेवक निवडून आले. 'वंचित'चे दोन, साई पक्षाचा एक आणि अन्य एका अपक्षाने शिंदेसेनेला पाठिंबा दिल्याने, शिंदेसेनेने बहुमताची ४० मॅजिक फिगर पूर्ण केली, तर काँग्रेस पक्षाच्या अंजली साळवे यांनी तटस्थ राहण्याचे जाहीर केले. शिंदेसेनेने वंचित, साई आणि अपक्ष नगरसेवकाच्या पाठिंब्यामुळे बहुमताचा आकडा पूर्ण केल्याने शिंदेसेनेचा महापौर होण्याचा मार्ग मोकळा झाला. महापौरपदी वर्णी लागण्यासाठी शिंदेसेनेतील ओबीसी नगरसेवकांमध्ये चढाओढ लागली आहे. दरम्यान, दोन्ही पक्षाचे नगरसेवक बराच काळ नॉट रीचेबल राहिले.

परभणीमध्ये उद्धव सेना २५, काँग्रेस १२, भाजप १२ राष्ट्रवादी अजित पवार ११, जनसुराज्य पक्ष ३, यशवंत सेना एक अपक्ष एक असे एकूण ६५ चे संख्याबळ आहे. तेथे शिवसेना आणि काँग्रेस एकत्र येत आहेत. गडचिरोलीमध्येही हे दोन पक्ष एकत्र येतील. परभणीमध्ये शिवसेनेचा तर गडचिरोलीमध्ये काँग्रेसचा महापौर होईल. उपमहापौरपद आघाडीतील दुसऱ्या क्रमाकांच्या पक्षाकडे जाईल. अकोला महानगरपालिकेत महापौर आणि उपमहापौरपदासाठीची निवडणूक अत्यंत चुरशीची बनली खरी, पण भाजपच्या शारदा खेडकर यांनी बाजी मारली. सांगली महापालिकेत भाजपमधील दोन्ही आमदार गटांच्या नगरसेवकांचा राष्ट्रवादी अजित पवार गटाला सत्तेत घेण्यास विरोध आहे. कारण राष्ट्रवादीला सत्तेत घेणे म्हणजे उंटाला तंबूमध्ये घेण्यासारखे आहे, असा मतप्रवाह भाजपमध्ये आहे. त्यावर पर्याय म्हणून शरदचंद्र पवार राष्ट्रवादी गटाला सोबत घेतले, तर सत्तेत मर्यादित वाटा देऊन स्थिर सत्ता राबवता येईल, असा मतप्रवाह आहे.

त्यासाठी भाजपकडून शरदचंद्र पवार गटातील एका हिंदुत्ववादी विचारांच्या नगरसेवकाशी संपर्क साधण्यात आला आहे. याबाबतचा जयंत पाटीलच निर्णय घेतील, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. जयंत पाटील यांनी महापालिकेच्या निवडणुकीत त्यांना सोडून गेलेल्या सर्वांचा विजयाचा मार्ग सुकर केला; मात्र शेवटी सत्तेची सूत्रे आपल्याच हातात ठेवून ते आपला हातचा दाखवून देण्यासाठी अशी झलक दाखवू शकतात.

कोल्हापूर महानगरपालिकेत सत्तांतर झाल्यानंतर आता महायुतीची सत्ता येणार हे स्पष्ट आहे. महायुतीमध्ये तीन पक्ष असल्याने ज्या पद्धतीने निवडणुकीत जागावाटप झाले, त्याच पद्धतीने सत्तेतील पदांचीही वाटणी करावी लागणार आहे. महापौर आणि स्थायी समिती सभापतिपदासाठी भाजपसह शिंदेसेनेचाही आग्रह राहणार आहे. या दोन पक्षांमध्ये महत्त्वाच्या पदांसाठी जोरदार रस्सीखेच होईल. अमरावती महानगरपालिकेच्या ८७ सदस्यीय सभागृहात युवा स्वाभिमान पक्षाचे १५, शिवसेनेचे (शिंदे गट) तीन सदस्य आहेत. याशिवाय भाजपचे सर्वाधिक २५, काँग्रेसचे १५, एमआयएमचे १२, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ११, बहुजन समाज पक्षाचे ३, शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) दोन आणि वंचित बहुजन आघाडीचा एक नगरसेवक आहे. तिथे कुणालाच बहुमत नाही. अहिल्यानगरमध्ये राष्ट्रवादी आणि भाजप मिळून सत्तासोपान चढू शकत असले, तरी यापूर्वीचा अनुभव लक्षात घेता महापौरपदासाठी भाजप कोणतीही समीकरणे जुळवू शकतो. त्यामुळे राज्यातील पक्ष सत्तेचे गणित कसे सोडवतात, हे यापुढील काळात बघावे लागणार आहे. **

# जिल्हाभरात मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद










वेश्वी


चेंढरे


थळ


चौल


रामराज


सातिर्जे




महाजने


खरआंबोली, राजापूर


शिघ्रे


आगरदांडा




अंबोली

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)